बालवाडीतील बहुभाषिकता-
सामाजिक दरीवर भाषेचा पूल

श्रध्दा सांगळे

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

बालवाडीतील बहुभाषिकता
सामाजिक दरीवर भाषेचा पूल

अभ्यासप्रकल्पाचा अहवाल

टीचर फेलो

सौ. श्रध्दा सांगळे

अर्थसहाय्य

सर रतन टाटा ट्रस्ट प्रणित

सेंटर फॉर लँग्वेज लिटरसी ॲण्ड कम्युनिकेशन

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

मनोगत

आपण स्वप्न बघावे आणि ते प्रत्यक्षात उतरावे असाच अनुभव मला ह्या प्रकल्प करताना आला. प्रकल्पाचे काम जसजसे पुढे जात होते तसतसे नवीन अनुभव येत होते. ह्यामुळे मी खूप काही शिकले. सुरुवातीला बालवाडीत येणारी कुरेशीनगरमधील हिंदी-भाषिक मुले शाळेत टिकण्यासाठी काम करायचे ठरविले पण नियोजन करताना जाणवले की वर्गात असलेल्या इतर मराठी-भाषिक मुलांनापण एक नवीन भाषा शिकायला मिळणार आहे. संख्येने जास्त असणाऱ्या मराठी-भाषिक मुलांना हिंदीची ओळख हसतखेळत झाली. मिश्र-भाषिक मुलांनी एकत्रित काम करत असताना सगळ्यांचीच शैक्षणिक प्रगती योग्य पध्दतीने घडून आली आणि हिंदी-भाषिक मुलांचा आत्मविश्वास वाढवून त्यांच्यात वाचन व लिखाणाबद्दल गोडी निर्माण झाली याचे मला समाधान वाटते.

काम चालू झाल्यानंतर, आधी केलेल्या विचारापेक्षा या कामाची खोली खूप आहे हे जाणवले. शाळेत येणारी सर्वच मराठी व हिंदी-भाषिक मुले मागासलेल्या, अशिक्षित वातावरणातील होती. या सगळ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी येवढेच नव्हे तर एकमेकांच्या जवळ आणण्यासाठी हिंदी आणि मराठी भाषांच्या माध्यमातून मी काम करीत होते. जणू सामाजिक दरी दूर करण्यासाठी बहुभाषिकतेचा सेतू बांधीत होते.

प्रकल्प पूर्ण होत गेला तसे मी स्वतःत होणारे बदल अनुभवले. या प्रकल्पातून मला स्वतःला खूप काही शिकायला मिळाले. मला मिळालेल्या संधिचे माझ्या क्षमतेप्रमाणे मी सोने करण्याचा प्रयत्न केला. मी वर्षभर वेगवेगळ्या भावनांचा अनुभव घेतला, कधी अस्वस्थ झाले, तर कधी आश्चर्यचकित. कधी कधी मनातून अपराधीपणही जाणवले. ह्या प्रकल्पाचे काम करताना मुलांचा अभ्यास करायला मिळाला. या सर्व गोष्टींचे ज्ञान मला पूर्वीच नव्हते याची खंत वाटत राहते.

आता काम पूर्ण झाले आहे याचे समाधान वाटते. मुलांबरोबर राहून असेच आणखी काम करण्याची संधी मिळावी असे वाटते.

ऋणनिर्देश

प्रगत शिक्षण संस्थेचे वातावरण वेगवेगळे प्रयोग करून पहायला, संशोधन करण्याला पूरक असल्यामुळे, मला काम करताना खूप प्रोत्साहन मिळाले. आमच्या संस्थेच्या संचालिका मॅक्सिन बर्नसन यांच्या प्रोत्साहनाने व प्रकल्पमार्गदर्शिका मंजिरी निमकर यांच्या मार्गदर्शनामुळे मला या प्रकल्पात मोलाची मदत झाली याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

'आपली शाळे' तील माझ्या सर्वच सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे व मदतीमुळे माझा प्रकल्प व्यवस्थित पूर्ण करता आला. सगळ्यात महत्त्वाची मदत माझ्या गटात शिकत असलेली जोहरियाची अम्मी अलमास कुरेशी यांनी केली. मला हवी असलेली माहिती देऊन व शाळेतील उपक्रमांमध्ये सहभागी होऊन त्यांनी मला मदत केली त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

माझ्या मोठ्या गटातील सर्वच बालगोपाळांचे विशेष आभार! कारण मी करीत असलेल्या वेग-वेगळ्या उपक्रमांमध्ये त्यांनी सहभागी होऊन उत्तम सहकार्य केले म्हणून मला माझा प्रकल्प पूर्ण करता आला.

सर रतन टाटा ट्रस्टच्या आर्थिक सहकार्याने या प्रकल्पाचे काम पूर्ण करताना मला खूपच आधार मिळाला याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

सगळ्यात महत्त्वाचा पाठिंबा मला माझ्या कुटुंबीयांनी दिला. या प्रकल्पाच्या लिखाणासाठी वेळ मिळावा म्हणून माझ्या दोन्ही मुलांनी व माझ्या नवऱ्याने मला खूप मदत केली. याबद्दल त्यांची सर्वांची मी विशेष आभारी आहे.

नीलिमाताई, मधुराताई, अपर्णाताई व संपूर्ण कंम्प्युटर विभागातील सर्वांचेच विशेष आभार. प्रत्येकानेच वेगवेगळ्या प्रकारे माझा प्रकल्प उत्तम होण्यासाठी मदत केली आहे.

श्रध्दा सांगळे

अनुक्रमणिका

- शीर्षक i
- मनोगत ii
- ऋणनिर्देश iii

समस्या समजावून घेणे १
कामाची पार्श्वभूमी ४
मंगळवारपेठेची पार्श्वभूमी ७
कुरेशीनगरची पार्श्वभूमी ९
कार्यप्रणाली व कामाचे नियोजन ११
i. मिश्रगट करणे १२
ii. मातृभाषेतून संवाद साधणे १४
iii. सूचनांसाठी दोन्ही भाषांचा वापर १६
iv. अक्षर ओळख १८
v. दोन्ही भाषांमधील एकाच अर्थाच्या गाण्यांचा वापर २०
vi. शब्दसंग्रह वाढवणे—वस्तूंचे प्रदर्शन, द्विभाषिक चार्ट २२
vii. गोष्टी आणि पुस्तक वाचन २७
viii. संस्कृतीची देवाण घेवाण ३०
ix. सादरीकरण ३६
अभ्यास प्रकल्पाचे परिणाम ३८

परिशिष्टांची यादी

१. द्विभाषेतील सूचनांची यादी
२. द्विभाषिक गाण्यांचा संग्रह
३. भाषांतर केलेल्या गोष्टी
४. वर्गात रोज दिसणाऱ्या कार्डांची यादी
५. चार्टमधील चित्रांच्या नावांची यादी

समस्या समजावून घेणे

'आपली शाळा' ही फलटणच्या मंगळवारपेठेमध्ये १९७८ साली शालाबाह्य मुलांसाठी सुरू झाली. या अनौपचारिक वर्गांना येणाऱ्या मुलांबरोबर त्यांची धाकटी भावंडे येत. ती मोठ्या मुलांना नीट शिकू देत नसत. म्हणून 'आपली शाळा'मध्ये बालवाडी सुरू झाली. 'आपली शाळा'त येणारी मुले ही शाळेच्या परिसरातील अनुसूचित जातींची, भटक्या जमातींची व कुरेशीनगरमधून येणारी मुस्लिम धर्माची आहेत. अनुसूचित जातीची मुले मराठी-भाषिक आहेत तर मुस्लिम मुले हिंदी-भाषिक आहेत. माझ्याकडे मोठ्या गटात येणाऱ्या तेवीस मुलांमध्ये या वर्षी (प्रकल्पाच्या कालावधीत) मराठी-भाषिक मुलांची संख्या हिंदी-भाषिक मुलांपेक्षा खूपच जास्त होती. मराठी-भाषिक मुले एकोणीस तर हिंदी-भाषिक मुले चारच होती.

कुरेशीनगर हा व्यवसायाने कसाई असलेल्या मुस्लिम समाजाचा परिसर आहे. हा व्यवसाय खालच्या दर्जाचा समजला जात असल्यामुळे इतर मुस्लिम समाजाशीदेखील त्यांचा कुठल्याही प्रकारचा संपर्क नाही. यांचे प्रार्थनास्थळही मोहल्ल्यातच. आतार, मणेर, शेख, पठाण, बागवान यांच्यात सोयरीकही नाही. त्याचा परिणाम संपूर्ण कुरेशीनगरमधील मोहल्ल्यात जाणवतो. अतिशय दाट लोकवस्तीच्या या मोहल्ल्यात स्वच्छतेचा आणि मोकळेपणाचा अभाव जाणवतो. या मोहल्ल्यातून येणारी मुले शाळेत अनियमित असतात. पालकांच्या आग्रहामुळे शाळेत येणारे मूल मध्येच मदरसेमध्ये जायला लागते. मग काही दिवसांनी मदरसा त्यांच्या सोईने बंद होते आणि मुले पुन्हा शाळेत न येता इकडे तिकडे खेळत राहतात. मुलांचे शैक्षणिक नुकसान होते. म्हणूनच या प्रकल्पांतर्गत मुलांची गळती थांबविणे व पुढे जाऊन या मुलांनी शिक्षण घ्यावे, असा उद्देश ठेवूनच मी काम सुरू केले. या हिंदी-भाषिक मुलांचे पण खूप अनुभव आहेत, अडचणी आहेत त्या जाणून घ्यायला हव्यात. शिकायची तयारी असली तरी एकदमच नवीन वातावरणात नवीन भाषेत वाचन, लेखनाकडे घेऊन जाताना, जो सहजपणा मराठी-भाषिक मुलांमध्ये दिसतो तसाच सहजपणा हिंदी-भाषिक मुलांमध्येपण यावा असे मला वाटते. शिक्षणाची आवड बालपणातच योग्य प्रकारे लागली तर पुढे ती वाढायला मदत होईल असे मला वाटते. मुले शालाबाह्य राहण्यामागे सांस्कृतिक व भाषिक कारणे आहेत असे मला जाणवले. म्हणूनच बालवाडीत माझ्याकडे येणारे मूल शाळेत नियमितपणे यावे व शाळेत टिकावे यासाठी वेगळे काम करावे असे मला वाटले.

कुरेशीनगरमधून येणारी मुले शाळेत येताना आपल्याच मोहल्ल्यातील इतर मुलांबरोबर येतात. शाळेत आल्यावर देखील आपल्याच गटात एकत्र राहतात. इतर मुलांबरोबर कोणताच संवाद साधत नाहीत कारण भाषेची अडचण. आपण हिंदीत बोललो तर इतर मुले आपल्याला हसतील म्हणून इतर मुलांबरोबर न बोलता आपल्याच मोहल्ल्यातून आलेल्या मुलांबरोबरच खेळतात. शाळेतील उपक्रमात

सहभागी होतानाही हिंदी-भाषिक मुले एकत्र राहतात. शाळेतील उपक्रमांतर्गत दिलेल्या सूचना न समजल्यामुळे मराठी-भाषिक मुलांप्रमाणे उपक्रमात सहभागी होऊ शकत नाहीत व त्यामुळे शाळेतील उपक्रमाची आवड वाटत नाही. काही काळाने या मुलांची गैरहजेरी वाढत जाऊन हिंदी-भाषिक मुले शाळाबाह्य होतात. मराठी-भाषिक मुलेपण हिंदी-भाषिक मुलांबरोबर मिसळत नाहीत. शाळेत येणारी मराठी-भाषिक मुले आपला वेगळा गट करून राहतात व सर्व उपक्रमातही आपल्याच गटात काम करतात.

कुरेशीनगरमधून येणारे मूल कोणत्या वातावरणातून आपल्याकडे येते आहे हे मी बघितले. केवढ्या अडचणीतून हे मूल आपल्यापर्यंत आले आहे तर त्याला आपल्यामध्ये सामावून घेण्यासाठी त्याच्या सर्व सांस्कृतिक व भाषिक अडचणी दूर करायला हव्यात. त्यातून मुलांचे गैरहजेरीचे प्रमाण कमी करता येईल असे मला वाटले.

शाळेमध्ये मुलांच्या भाषेला आधार द्यायला हवा. ती स्वीकारायला हवी. नुसती शिक्षकांनीच स्वीकारायला हवी असे नाही, तर मुलांच्या सहाध्यायांनीही ती स्वीकारायला हवी. आणि स्वीकार हा केवळ ही त्यांची भाषा आहे किंवा ते अमूक एका भाषेत बोलतात येवढाच नसून मी पण ती भाषा शिकणार आहे. माझ्या भाषेतल्या अमूक एका शब्दाला त्या भाषेत काय म्हणतात? अशी जिज्ञासा निर्माण व्हायला हवी असे वातावरण शाळेत असेल तरच मिश्र भाषेची मुले शाळेत आली तरी त्यांची प्रगती एकसारखीच व्हायला मदत होते.

मुस्लिम मुला-मुलींना आज मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी राज्याची आणि परिसराची भाषा यायला हवी. तरच त्यांना शाळेत अडचण येणार नाही व अधिक मार्क पडतील तसेच पुढे चांगल्या नोकऱ्या लागतील.

शाळेत येणारे मूल शाळेपर्यंत येईपर्यंत कोणकोणत्या अडचणीतून येते याची जाणीव शिक्षक म्हणून आपल्याला असायलाच हवी, तरच आपण योग्य प्रकारे मार्गदर्शन व शाळेतील उपक्रमांचे नियोजन करून मुलांना शाळेची आवड लावून ते मूल शाळेत टिकवून ठेवू शकू. मूल शाळेत येणे महत्त्वाचे पण ते टिकणे हे त्यापेक्षाही महत्त्वाचे आहे.

बालवयातील मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत सतत नाविन्य असेल तर मूल आवडीने शिकते. तसे रोजच्या अनुभवातूनही ते शिकतच असते. वेगवेगळ्या भाषेतील मुले एकत्र आल्यावर एकमेकांची भाषा काही काळाने समजू शकतील व गरजेप्रमाणे काही शब्द बोलतीलही पण हिंदी-भाषिक मुलांच्या पुढील शिक्षणासाठी शाळेतील सर्व उपक्रमांत त्यांचा पूर्ण सहभाग असण्यासाठी विशेष नियोजन करून काम केले तर चांगले परिणाम मिळतील असे मला वाटते. म्हणून माझ्याकडे येणाऱ्या या चार हिंदी-भाषिक मुलांसाठी वेगळे नियोजन करण्याचे मी ठरवले जेणे करून या चार

हिंदी-भाषिक मुलांना शिकण्याची आवड वाटेल.

हिंदी-भाषिक मुलांसाठी शाळेच्या उपक्रमांमध्येच खास बदल करून नियोजन करायला सुरुवात केल्यानंतर जाणवले की या चार जणांबरोबर जी मराठी मुले आहेत ती पण हा बदल अनुभवणार आहेत. त्यांना हिंदी भाषेची ओळख होऊन, उपक्रमामध्ये सहभागी होऊन, याचा चांगलाच उपयोग होईल. सगळ्यांना सामावून घेऊन काही जाणीवपूर्वक उपक्रम केले तर त्यात सहजपणा येऊन दोन्ही भाषिक मुलांमध्ये संवाद उत्तम घडून माझ्या कामाला व त्यासाठी केलेल्या नियोजनाला चांगलीच मदत होईल असे मला जाणवले म्हणून दोन्ही भाषेतील मुलांचा विचार करून नियोजन तयार केले.

कामाची पार्श्वभूमी

आपली शाळा

बालवाडीतील मुलांबरोबर काम करताना त्यांच्यामध्ये उपजतच असलेल्या गुणांची जाणीव, निरागसपणा, कुतूहल, नाविन्याची ओढ या सगळ्यांचा आविष्कार अनुभवताना मिळालेले समाधान शब्दात सांगणे अशक्यच. आपल्याच विश्वात रमणाऱ्या, सतत नवीन शिकण्यासाठी धडपडणाऱ्या मुलांना त्यांच्या शैक्षणिक वाढीसाठी योग्य असे अनुभव देण्याची मोठी महत्त्वाची जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न मी कमला निंबकर बालभवनमध्ये बालवाडी शिक्षिका झाल्यापासून करीत आहे.

प्रगत शिक्षण संस्थेच्या 'कमला निंबकर बालभवन' व 'आपली शाळा' या दोन शाळा आहेत. मंगळवार पेठेच्या परिसरात अधिकतर मोलमजुरी करून पोट भरणारे लोक राहतात. त्यांच्यासाठी डॉ. मॅक्सीन बर्नसन यांनी प्रगत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून 'आपली शाळा सुरू' केली. प्रथम पूरक वर्ग— नंतर बालवाडी— नंतर शिवण वर्ग—नंतर खेळघर अशी आपली शाळेची वाटचाल चालू होती आणि या शाळेचा परिसर माझी कार्यभूमी कधी झाली हे मलापण समजले नाही. सुरुवतीचे सहा महिने कमला निंबकर बालभवनमध्ये काम केल्यानंतर मला 'आपली शाळा' मध्ये काम करण्याची संधी मिळाली. मी 'आपली शाळे' त प्रथम गेल्यावर बघितले की बालवाडीत एकूण सतरा मुले

येत होती. शाळेत येणारी मुले शाळेच्या आसपास राहणारी अनुसूचित जाती व भटक्या जमातीची मराठी-भाषिक होती.

शाळेत मुलाचे नाव घातले जायचे, पण सर्व मुले शाळेत उपस्थित रहात नव्हती. शाळेत येणारी मुले अस्वच्छ असत. शाळेत येण्याची वेळ नक्की नव्हती. बरोबर डबा नसायचा. डब्याच्या सुट्टीला पळत घरी जायचे व ताटलीत शिळा भात किंवा कागदात भाकरी घेऊन शाळेत यायचे. मुलींच्या फ्रॉकला बटणे नसायची. मुलांच्या चड्डीची चेन गायब असे. मग शाळेत काजल, कांचन या मुलींच्या फ्रॉकला बटणे शिवून द्यायची व ऋतिकच्या चड्डीला दोरी बांधायची. या वातावरणात बदल व्हावा म्हणून पालकांशी बोलत शाळेचे महत्त्व पटविणे, मुलांना वेळेवर शाळेत पाठविण्यासाठी समजावणे व कुटूंब नियोजनाचे महत्त्व मुलांच्या आईला समजावून सांगणे अशा संभाषणातून पालकांबरोबर संवाद वाढवून, शाळेबद्दल व शाळेतील वातावरणाबद्दल पालकांच्यात विश्वास निर्माण केला.

दोन वर्षांत हळूहळू मुलांची उपस्थिती वाढली. सगळा बदल लगेच घडला नाही. शाळेत येणारी मुले संख्येने वाढत होती. त्यातच शाळेत एका हिंदी-भाषिक मुलाचे ॲडमिशन प्रथमच झाले. 'आपली शाळा' पासून थोडे लांब असलेल्या कुरेशीनगर या भागात सर्व मुस्लिम धर्मीय लोकांचे वास्तव्य आहे. व्यवसाय कसाई काम. परिसरात व घरात बोलली जाणारी भाषा हिंदी. अशा वातावरणातून येणारी मुले हिंदीशिवाय कोणत्याच भाषेला रुळलेली नव्हती. माझ्याबरोबर काम करणाऱ्या भाभी उर्फ नजमा मणेर यांची मुलांच्या पालकांबरोबर ओळख होती व स्वतः भाभी कुरेशीनगरमध्ये कुराण शिकवायला जायच्या. त्यामुळे कुरेशीनगर परिसराची व तिथल्या वातावरणाची त्यांना चांगलीच माहिती होती. 'आपली शाळे'त नव्याने ॲडमिशन झालेला 'आलताब' पहिल्या दिवसापासून रडत होता. भाभी त्याच्याबरोबर हिंदीत बोलायच्या 'अरे, अम्मी अभी आयेगी!' 'रो नही!' अशी समजूत काढल्यावर आलताब शांत बसायचा. याच आलताबची चुलत बहीण 'जैनब' देखील शाळेत आली. दोघेजण (आलताब व जैनब) फक्त भाभींबरोबर बोलायचे, त्यांच्याच जवळ बसायचे. आता आमच्याकडील मुलांची संख्या वाढल्यामुळे आम्ही मुलांची वये बघून गट तयार केले. आलताब व जैनब इतर मुलांबरोबर भाभींकडील शिशू गटात बसायचे, वयाने मोठी असलेली मुले वेगळ्या गटात म्हणजे माझ्या गटात बसायची. भाभी आलताब, जैनब बरोबर कसे बोलतात ते मी बघत होते आणि मला हे पण जाणवत होते की दोन्ही मुले पुढच्या वर्षी माझ्याकडे येणार आहेत, त्यामुळे आत्तापासून आपण पण या मुलांबरोबर हिंदीत संवाद साधायला हवा.

ठरल्याप्रमाणे मी हिंदीमध्ये संवाद साधण्याचा प्रयत्न करायला लागले,
'अरे वा! आज मेहेंदी लगाई ।' 'कल क्यों नही आयी?' 'डिब्बे में क्या लाया?' 'चलो ! जैनब हम सब खेलते हैं ।'
या सर्व संवादामुळे, आलताब, जैनब शाळेत आल्यावर, माझ्याबरोबर स्वतःहून हिंदीत बोलू लागले. मी पण दोघांची हिंदीमध्ये विचारपूस करू लागले . नवीन काय आणले. कुठे गेले याबद्दल आमच्यात

गप्पा घडू लागल्या. आमच्यामधील संवाद वाढत होता. आमच्या तिघांमध्ये मायेचा, विश्वासाचा धागा निर्माण झाला, तो भाषेमुळे आणि ती भाषा होती हिंदी. दोघांच्या (आलताब व जैनब) परिचयाच्या भाषेचा वापर मी माझ्या संवादात केल्यामुळे, दोघेही आत्मविश्वासाने माझ्याबरोबर बोलायला लागले.

मंगळवारपेठेची पार्श्वभूमी

'आपली शाळा' फलटणमधील मंगळवारपेठेत आहे. या भागातील वस्ती बहुतांश दलित समाजाची व काही थोड्या प्रमाणात वडार समाजाची आहे. बहुतेकांची दारिद्र्य रेषेखाली मोडतील अशीच आर्थिक परिस्थिती आहे. सगळ्या परिसरात एका गोष्टीचे साम्य आहे ते म्हणजे प्रत्येकाच्या घरातील कमीत कमी एक तरी दारूच्या आहारी गेलेला आहे.

गरिबी, अज्ञान, अंधश्रध्दा यामुळे सतत भांडणे, मारामारी या परिसरात चालूच असते. इथल्या लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे भाजीपाला विकणे, शेंगा, कलिंगड याप्रमाणे ऋतुमानाप्रमाणे मिळणाऱ्या फळांची विक्री करणे, मोलमजुरी करणे आणि मोठ्या प्रमाणात गुप्तपणे चालणारे व्यवसाय म्हणजे हातभट्टीची दारू विकणे, सट्टा खेळणे, वेश्या व्यवसाय व चोरलेला भंगार माल विकणे. यामुळे पोलिसांची गाडी या भागात सतत दर्शन देत असते.

शिक्षणाचे महत्त्व शाळेत मिळणाऱ्या भातापुरते मर्यादित. शाळेत मिळणारे युनिफॉर्म, पुस्तके याचे महत्त्व फार पण भात खाल्ल्यानंतर पुढच्या तासांना ते मूल शाळेत जाईलच याची खात्री नाही. बायकापण आपला रिकामा वेळ मुलीच्या डोक्यातील उवा काढण्यात किंवा शेजारच्या घरी जाऊन टी. व्ही. बघण्यातच जास्त घालवतात. काही घरांमध्ये शिक्षणाचे महत्त्व मानले जाते. आई वडील शिकलेले

असल्यामुळे त्यांची मुले शाळेत जातात पण आपल्या परिसरातील शाळेत घातली जात नाहीत तर मंगळवार पेठेहून लांब असणाऱ्या शाळेत ही मुले शिकतात. मंगळवार पेठेच्या बाहेर पडण्याचे स्वप्न सारे बघतात, त्यांनाही कदाचीत आपली मुले इथे राहून गुन्हेगारीकडे वळू नयेत असे वाटत असेल.

या परिसरातील घरे छोटी आहेत त्यामुळे मूल बाहेरच खेळत असते आणि घरी असेल तर टी. व्ही. बघत बसते. लहान मुलांनापण या परिसराची चांगलीच जाणीव असावी. कोणाकडे पोलीसांची गाडी आली, कुठे मारामारी झाली, कोणी चोरी केली याबद्दल चाललेले संवाद ही मुले ऐकतात आणि शाळेत आल्यावर आम्हाला सांगतात. घरात स्वयंपाक केला नाही या कारणासाठी शाळा बुडविणारी मुले आहेत. दारूच्या व्यसनांमुळे कितीतरी घरांची वाताहात झाली आहे. बायकापण सट्ट्याचे नंबर लावताना, पत्ते खेळताना बघायला मिळतात.

'आपली शाळे'त येणारी मुले मोठ्या प्रमाणात याच परिसरातून येतात. घरात शिक्षणासाठी अजिबात पोषक वातावरण नसल्यामुळे, मुलांना शाळेची आवड वाटावी असे वेगवेगळे उपक्रम शाळेत राबवावे लागतात. तरी पण जत्रा, देवीचे उपास, आजारपण अशा अनेक कारणांमुळे मुलांची गैरहजेरी असते. पालकांना वरचेवर सांगून देखील या सर्व प्रकारात फारसा फरक पडत नाही.

घरात भांडणे होतात, नवरा काही कमवत नाही, दारू पिऊन मारतो अशा अनेक कारणांसाठी बायका माहेरी जाण्याचे प्रमाण जास्त आहे. आईबरोबर मुले पण आजोळी जातात. गृहभेटी करून सतत समजावून सांगून सांगून आठ दहा दिवसानंतर मूल शाळेत येते.

गेल्या एक दोन वर्षात समाज मंदिरात बुध्दवंदनेसाठी येणाऱ्या लोकांचे प्रबोधन करण्याचे काम चालू आहे. दारू पिऊ नका अशा प्रकारचा संदेश देण्याचे कर्तव्य पार पाडले जाते, पण प्रत्यक्षात तिळभरही बदल झाला नाही. बायकांनी घरच्या त्रासाला कंटाळून जाळून घेणे, कॅनॉलमध्ये जीव देणे काही बंद झाले नाहीत. समाज बदलाची प्रक्रिया फार हळूहळू होते हे मी स्वतः येथे काम करताना अनुभवते.

गेल्या सहा वर्षांत शिक्षणाबद्दल जागृती झालेली जाणवते कारण दुसऱ्या गावातून आलेल्या तरूण सुना शिकलेल्या आहेत. कमीत कमी दहावी-बारावी शिक्षण झालेले आहे. त्यामुळे मुलांना शाळेत पाठवायचे तर दाखला हवा हे त्यांना समजत असल्यामुळे दाखले वेळेवर मिळायला लागले आहेत. काही गोष्टी समजावून सांगितल्यातर समजून घेतात. जसे की मुलांना दोन वर्षाचे असताना शाळेत ॲडमिशन मिळत नाही, किंवा मुलांची तीन वर्षे बालवाडी झाल्यावरच पहिलीत पाठवा. सगळेच ऐकतात असे नाही. काहीजण भातासाठी मुलांना चार वर्षाचे असताना पण पहिलीत घालायला तयार असतात. वयाने लहान असलेल्या मुलाचे नाव शाळेच्या मस्टरवर नसते फक्त शाळेतील संख्या दाखविण्यासाठी या मुलांचा शाळेला उपयोग. पूर्ण परिसर सुधारायला शिक्षणाचा प्रसार आणखी व्हायला हवा व व्यसनाधीनता कमी व्हायला हवी.

कुरेशीनगरची पार्श्वभूमी

मंगळवारपेठेचा पुर्वेकडील भाग म्हणजे कुरेशीनगर. हा भाग 'आपली शाळे' पासून थोडा लांब आहे. कुरेशीनगर परिसरातील लोकसंख्या दाट आहे. प्रत्येक कुटुंबात मुलांची संख्या जास्त. लहान वयात लग्न होऊन पाच ते सहा वेळा तरी मातृत्व पदरात पडते इथल्या मुलींच्या. राहण्याची घरे खूप छोटी-छोटी आहेत. काही लोकांनी मोठे बंगले पण बांधले आहेत. कुरेशीनगरमध्ये आर्थिक परिस्थितीमध्ये असमानता जाणवते. काही लोक अतिश्रीमंत आहेत ज्यांनी मोठ्या इमारती बांधल्यात तर खूपजण अतिगरीब आहेत ज्यांच्या घरात एक वेळेला जेवण मिळाले तरी खूप झाले.

कुरेशीनगरमध्ये मुस्लिम ओ. बी. सी. हे खाटिक समाजाचे लोक राहतात. व्यवसायाने खाटिक असल्याने इतर मुस्लिम समाजापासून वेगळा पडल्यासारखा हा समाज आहे. त्यामुळे मागासलेपण जास्तच जाणवते. परिसरात स्वच्छतेचा अभाव आहे. त्यामुळे आजार व रोगांचा मुक्तसंचार आहे.

कुरेशीनगरमध्ये धर्माचे शिक्षण बंधनकारक आहे पण इतर ज्ञान काहीच दिले जात नाही. स्वच्छतेच्या बाबतीत बोलायलाच नको कारण कपड्यांना वास येईपर्यंत कपडे अंगावर ठेवायचे आणि फक्त शुक्रवारी (जुम्मे के जुम्मे) आंघोळ करून कपडे बदलायचे व नमाज पढायचे. शुक्रवारीच घर झाडून स्वच्छ करायचे. घरात कुठेपण थुंकायचे, केसांना तेल नाही की फरशी झाडायची नाही.

येवढ्या सगळ्यातून कुरेशीनगरमधील हातावर मोजता येतील येवढ्यांनीच शाळेचे तोंड बघितले आहे, पुरुषांनी तर शाळेची पायरीपण बघितली नाहीये. बायकांमध्ये काही जणीच पाचवी-सहावी पर्यंत शिकल्या आहेत. शिकलेल्या बायका कुरेशीनगरमधील सुना आहेत, ज्या मिरज, पाचगणीमधून आलेल्या आहेत. बऱ्याच जणींना फक्त आपले नाव लिहिता येते. व्यवसायच करायचाय, शिक्षणाची काय गरज आहे असे ठाम मत या परिसरातील सर्वांचे आहे. शिक्षण घ्यायचे तर ते फक्त धार्मिक रुढी-परंपरांचे या मतासाठी सर्व आग्रही आहेत. व्यवसायामुळे पुरुषांमध्ये दारूचे व्यसन व महिलांमध्ये मिश्रीचे व्यसन, बऱ्याच प्रमाणात जाणवते.

आपल्या भोवती काय घडते आहे याकडे लक्ष द्यायला पालकांना वेळ कधी मिळणार? बायकांनी सतत बुरख्यात रहायचे. धर्माची बंधने सतत सांगण्याचे काम जमातीचे लोक करीत असतात, जसे की बुरखा घालणे, नमाज पढणे. दुसऱ्या गावावरून जमातीचे लोक कुरेशीनगरमध्ये येतात तर कुरेशीनगर समाजातील बुजूर्ग व ज्यांचा धर्माचा अभ्यास आहे असे दुसऱ्या गावाला जाऊन जमातीच काम करतात.

आमच्याकडे मुलांना ॲडमिशन घ्यायला बायकाच येतात. सतत तोंडात मिशरी आणि बोलता बोलता थुंकायला जायचे. शेवटी आम्हाला सांगावे लागते शाळेत असे थुंकू नका, मुले पण तसेच अनुकरण करतील. मग मात्र शाळेत आलेले पालक लगेच ऐकतात. आपल्या मुलांनी शिकावे, इतर मुलांबरोबर मिळून मिसळून खेळावे असे पालकांना मनापासून वाटते हे मला जाणवले. पण समाजातील बंधनांमुळे, व्यवसायामुळे आपण इतरांपासून दूर राहतो याचे वाईट वाटते अशा प्रतिक्रिया काही पालकांकडून मला मिळाल्या. 'आपली शाळेत' दोन वर्षापासून कुरेशीनगरमधून येणारी मुले बालवाडी पूर्ण झाल्यावर, मंगळवारपेठेतच कुरेशीनगरच्या जवळ असलेल्या 'प्रबुध्द विद्यामंदिर' मध्ये पाठविले जातात.

माझ्या सहकारी नजमा मणेर या एकोणीस वर्षापूर्वी कुरेशीनगरमध्ये बायकांना कुराण शिकवायला जायच्या. सलग नऊ वर्षे त्यांनी कुरेशीनगरमध्ये काम केले. त्यावेळी घरा-घरासमोरच कसाई काम केले जायचे. आज मोहल्ल्यात असणारा बर्फ कारखाना व आतड्यांची सफाई करण्याचा कारखाना त्यावेळी नव्हता.

मंजूताई व भाभी (नजमा मणेर) यांनी कुरेशीनगरमधील मुलांना मराठी शिकवण्यासाठी प्रयत्न केले. पण या परिसरातील हाफीजना हा बदल नकोसा होता. मशीदीमध्ये या परिसरातील मुलांसाठी बालवाडी काढली तर मोहल्ल्यातील लोक तिथे जाऊन झोपायचे. मग बालवाडी कशी चालणार? शेवटी हे सर्व प्रयत्न बंद पडले.

कार्यप्रणाली व कामाचे नियोजन

जूनमध्ये शाळा सुरू झाली. शाळेचे पहिले काही दिवस मुलांचे निरीक्षण करून, वर सांगितलेल्या समस्या जाणवल्या. या सर्व समस्यांमधून वेगळे नियोजन केले ते खालीलप्रमाणे–

जुलै – हिंदी व मराठी-भाषिक मुलांचे मिश्र गट करणे.

ऑगस्ट – शाळेत द्यावयाच्या सूचनांची मराठीतून व हिंदीतून यादी तयार करणे.

सप्टेंबर – एकाच अर्थाच्या हिंदी-मराठी गाण्यांचे संकलन व गायन.

ऑक्टोबर – शब्दसंग्रह वाढवणे, अक्षर ओळख.

नोव्हेंबर – मुलांमधील आंतरक्रियेच्या नोंदी ठेवणे.

डिसेंबर – मराठी-भाषिक मुलांबरोबर हिंदी व हिंदी-भाषिक मुलांबरोबर मराठीत संवाद

जानेवारी – हिंदीमधील 'आओ पढें', व मराठी मधील 'चला वाचूया' पुस्तकांचे वाचन

फेब्रुवारी – मिश्र भाषेचा वापर करून नाटकाचे सादरीकरण, तयारी, आठवड्यातील एक दिवस हिंदी दिवस म्हणून सादर करणे.

मार्च – सादरीकरण

मिश्र गट करणे

एकमेकांच्या जवळ राहणारी, नात्यातली, मोहल्ल्यातली अशी मुले गटागटाने शाळेत येतात. गटातच राहतात व जातानाही त्याच गटात जातात. शाळेतील उपक्रमही त्याच गटात करताना आढळतात. मराठी-भाषिक मुले हळूहळू इतरांच्यात मिसळू लागतात. परंतु हिंदी-भाषिक मुलांच्या भिन्न भाषेमुळे ती कायमच वेगळी राहतात.

जून महिन्यात शाळा सुरू झाल्यानंतर पंधरा दिवसात मुलांची संख्या बऱ्यापैकी निश्चित झाली. नंतर वेगवेगळ्या वातावरणातील मुलांना इतर मुलांबरोबर काम करण्याची संधी मिळावी म्हणून मी जाणीवपूर्वक मिश्र गट तयार केले.

मुलांचे गट

जूनमध्ये शाळा सुरू झाल्यानंतर सर्व मुलांची छान ओळख झाली. कोण कुठे राहतो याची पण माहिती झाली. जुलै महिन्यापासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. माझ्याकडे एकूण एकोणीस मराठी भाषिक व सहा हिंदी भाषिक मुले. मुलांचे गट करताना प्रत्येक गटात एक तरी हिंदी-भाषिक मूल येईल याची काळजी घेतली. दोन गटात दोन-दोन मुले हिंदी- व भाषिक इतर दोन गटांत एक एक मूल हिंदी भाषिक होते. एकाच भागातील मराठी-भाषिक मुले ही वेगवेगळ्या गटात विभागून जातील हे पाहून गट तयार केले. प्रत्येक गटाला एकेका फळांचे नाव दिले.

गट

आंबा	कलिंगड	संत्री	सफरचंद
साहिल	संजना	प्रतिक्ष	धनराज
सौफीया	आफताब	श्रुती	आदिती
यश	प्रतिक	सुजल	जोहरिया
ऋतिक	ओंकार	सुरज	अनिकेत
आदित्य काकडे	तुषार	आदित्य गुंजाळ	सोनम
भैरवी	जिया	उमर	सुजल
तोहीद			

गट तयार करून झाल्यावर सर्व मुलांना त्यांचे नाव घेऊन ते कोणत्या गटात आहेत ते सांगितले सांगितले. गटाच्या फळांची चित्रे समोर ठेऊन, आपल्या गटाच्या चित्राच्या बाजूने गोल करून बसवले. प्रत्येक गटात छोटे कार्डपेपर देऊन ते खडूने रंगवायला लावले (प्रत्येक गटाला एक) गटाचे कार्ड रंगबीरंगी खडूने रंगवून घेतल्यावर त्याच्या मागे गटाचे नाव लिहून ठेवले.

दुसऱ्या दिवशी आंबा, कलिंगड, संत्री, सफरचंदाच्या आकाराचे कागद कापून आणले व परत गटाचे नाव घेऊन व त्यातील मुलांची नावे सांगत मुलांना गटात बसविले. प्रत्येकाच्या गटाप्रमाणे त्या त्या गटाला फळांचे आकार असलेले छोटे कागद दिले. मुलांनी आपल्या गटाच्या नावाचे फळ रंगवायचे होते. गटात काम करताना एकमेकांची मदत घेत, संवाद साधत काम चालू होते. पहिल्या दिवशी ग्रुपमध्ये रंगवून घेतलेल्या कार्डपेपरवर बर गटाचे नाव, त्याखाली डावीकडे त्या गटातील मुलांची नावे त्या समोर त्यांनी रंगविलेली फळे चिकटवून चारी गटांची कार्डे (मुलांच्या नावासहीत) बोर्डवर लावून ठेवली. संपूर्ण जुलै महिना उपक्रम करताना तयार केलेल्या आपल्याच गटात काम करायला मुलांना सांगितले.

प्रार्थनेच्यावेळी मी गटाचे नाव असलेले कार्ड पुढे ठेऊन गटाचे नाव वाचून दाखवायचे व त्या गटातील मुलांनी त्या कार्डासमोर बसायचे असे आठ दिवस सलग करीत होते. नंतर मुलांना गटाचे नाव पुन्हा वाचून दाखवावे लागले नाही. सर्वजण आपल्याच फळाच्या नावाच्या गटात काम करायला लागले.

मातृभाषेतून संवाद साधणे

शाळेत मुलांच्या पूर्वज्ञानाचा वापर करून त्यावर इमारत उभारायला हवी. या पायावर सुरूवात करून मुलांमध्ये आणखी कौशल्ये विकसित करायला हवीत. मूल शाळेत येताना जे अनुभव घेऊन येते ते पूर्ण मोडीत काढून नवीन शिक्षण देण्याचा प्रयत्न करून चालत नाही, मूल लगेच नवीन शिकणार नाही.

शाळेच्या सुरुवातीच्या काळात माझ्याकडे येणाऱ्या मुलांशी त्यांच्या बोलीभाषेतूनच संवाद करायचा मी ठरविले. मराठी मुलांची भाषा एकदम शुध्द अशी काही नव्हती त्यामुळे मला पण थोडे बोलताना याचा विचार करावा लागला. 'व्हय र', 'मूतायला', 'हगायला' अशा शब्दांचा सर्रास वापर करणाऱ्या मुलांना न दुखावता आपल्याच बोलण्यातून योग्य शब्द वाक्यात वापरून मराठीत संवाद साधायचा होता. म्हणूनच मराठी-भाषिक मुलांबरोबर शाळेत आल्यापासून घरी जाईपर्यंत मराठीतच संवाद साधायला सुरुवात केली.

तसेच कुरेशीनगरमधून येणाऱ्या मुलांची भाषा हिंदी होती पण ती बोलण्याची पध्दत वेगळी होती. लहान मूल असले तरी त्यांच्याबरोबर बोलताना 'आप, आवो, दो जी' असे आदराने मायेने बोलले जाते हे मला एका पालकांकडून समजले. मुलांच्या जवळ जाण्यासाठी त्यांच्याच बोलीभाषेचा आपण उपयोग करायला हवा ज्यामुळे मी त्यांना त्यांच्यातीलच वाटावे व आमचा संवाद सहज होईल असे मी ठरवले होते व त्याप्रमाणे काम सुरू केले.

शाळेत आलेल्या मुलाच्या दृष्टीने आपल्याकडे ताईंचे लक्ष आहे, ताईंनी मला शाळेत आलेले बघितले, त्यांनी माझी विचारपूस केली या सर्व गोष्टींना खूप महत्त्व असते. शाळेतील उपक्रमांची सुरुवातच मूल शाळेत आल्यापासून झालेली असते. म्हणूनच शाळेत आल्याबरोबरच मराठी-भाषिक मूल असेल तर 'अरे वा, खूप छान दिसतोय ड्रेस तुला' असे म्हणून त्याचे स्वागत करायचे व हिंदी-भाषिक मूल असेल तर 'आपने आज बाल अच्छे बनाये हैं।' अशा त्यांच्याच भाषेत बोलून त्यांचे स्वागत करायचे.

मग संपूर्ण दिवसात होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती देताना व मुलांना आलेल्या अडचणी सोडवताना देखील त्या मुलांच्या बोलीभाषेतूनच संवाद करायला सुरुवात केली. पंधरा दिवसातच मला या सर्वांचे परिणाम जाणवले. दोन्ही भाषेची मुले शाळेचे गेट उघडतानाच माझ्याकडे हसून बघायची व आता आपल्याबरोबर ताई बोलणार ! आपल्याकडे त्यांचे लक्ष आहे, याचे समाधान, विश्वास मला मुलांच्या चेहऱ्यावर दिसायला लागायचा.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मराठी-भाषिक मुलांना पण जाणवत होते की आपल्याबरोबर हिंदी भाषा बोलणारी मुले आहेत. कारण हिंदी-भाषिक मुलांबरोबर बोलताना मी हिंदीत बोलत आहे हे ते ऐकत होते. हिंदी-भाषिक मुलेपण माझ्याबरोबर हिंदीत बोलत होती. मुलांच्या बोलीभाषेचा वापर त्या त्या मुलांबरोबर केल्यामुळे मुले शाळेत आल्याआल्याच आपण कुठे गेलो होते, काय बघितले, हे मला मोकळेपणाने सांगायला लागली. यात हिंदी व मराठी भाषिक मुलांचा सारखाच अनुभव आला हे विशेष नमूद करावेसे वाटते.

शिक्षक कायम मराठीतच बोलत राहिले तर हिंदी-भाषिक मुलांना वर्गात काय चालले आहे हे नीट समजत नाही. उत्तर द्यायचे किंवा प्रश्न विचारायचा तर मराठीतच बोलले पाहिजे. पण तितके शब्द भंडार नाही. वाक्य रचनेची खात्री नाही, मुले हसतील, मस्करी करतील त्यापेक्षा गप्पच बसलेले बरे म्हणून भिन्न भाषिक मुले वर्गाच्या उपक्रमातून वेगळी पडतात. वर्गात हिंदीचा वापर केल्यावर सगळ्यांच्या मागे कुठेतरी कंटाळलेला चेहरा करून बसलेली मुले जेव्हा चमकून वर बघतात, चेहऱ्यावर आश्चर्याचे हसू येते आणि उत्तर मिळते तेव्हा कळते आपण त्यांच्यापर्यंत पोहोचले आहोत.

सूचनांसाठी दोन्ही भाषांचा वापर

मूल शाळेत आल्यापासून शाळेतून घरी जाईपर्यंत वेगवेगळ्या उपक्रमांतर्गत आपल्याला त्यांना ठराविक सूचना द्याव्याच लागतात. माझ्या उपक्रमाचा हा एक महत्त्वाचा सुरुवातीचा भाग आहे असे मला वाटते कारण मूल शाळेत येते, पण ते शाळेत टिकवण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते हा माझा एवढ्या वर्षांचा अनुभव. माझ्याकडे येणाऱ्या हिंदी-भाषिक मुलांना सर्व उपक्रमांचे नियम समजणे व त्यांनी इतर मुलांच्या बरोबरीने त्यात सहभागी होणे गरजेचे होते.

सुरुवतीच्या काळात कुरेशीनगरमधील मुलांबरोबर मी हिंदीतच बोलत होते. संवाद तर साधला पण आता त्याच्यापुढे जाऊन त्यांना मराठी भाषेची, सूचनांची ओळख होणे गरजेचे होते यासाठी रोजच्या उपक्रमांतर्गत ज्या काही ठराविक सूचना द्याव्या लागतात, त्यांची मी यादी तयार केली. सूचना समजल्यामुळे सूचना देताना सुरुवातीचे काही दिवस पहिली सूचना हिंदीत देऊन तीच सूचना नंतर मराठीत देत होते. काही दिवसांनी प्रथम मराठीत सूचना देऊन नंतर हिंदीत दिली. हिंदी सूचना देताना त्यांच्या हिंदी बोलीभाषेत त्या दिल्या जातील याची काळजी घेतली. प्रत्येक सूचना देताना माझ्या देहबोलीतून देखील मुलांना सूचना समजेल याची काळजी घेतली. सूचना कमी व मुलांना समजतील अशा सोप्या शब्दात तयार केल्या.

उदा.	मराठी	हिंदी
	डबा इथे ठेवा.	डिब्बा इधर रखो।

सूचना दोन्ही भाषेत असल्यामुळे प्रत्येक उपक्रमाची ओळख सर्वच मुलांना सारखीच व्हायला मदत झाली. प्रत्येक उपक्रमाची माहिती समजल्यामुळे हिंदी-भाषिक मुलांना शाळेतील सर्व उपक्रमांमध्ये काम करणे सोपे झाले.

वर्गात दोन्ही भाषेत सूचना दिल्या जातात हे आता मुलांच्या लक्षात आले होते. माझ्या गटातील मराठी-भाषिक संजनाने मला विचारले, "बाई, असं दोनदा का तुम्ही सांगता? एकदाच सांगा की."
मी म्हणाले, "आपल्याकडे हिंदी बोलणारी मुले आहेत ना, त्यांना सर्व उपक्रम समजायला पाहिजे म्हणून हिंदीत पण सांगायला हवंय ना?"
संजना म्हणाली, "मग हिंदीतच सांगा. आम्हाला कळतयं."
दुसऱ्या दिवशी मी मुलांना विचारले, "मी फक्त हिंदीत सूचना दिल्या तर चालतील का?"
सगळ्यांनीच हो असे मोठ्याने सांगितले. म्हणून मग एक दिवस फक्त हिंदीत व एक दिवस फक्त मराठीत अशा आलटून-पालटून सूचना द्यायला सुरुवात केली. सूचना देताना देहबोलीतून मुलांना

सूचना समजायला मदत होत होती. हिंदी-भाषिक मुलांना मराठीत सूचना दिल्यावर समजतात का याकडे मी विशेष लक्ष दिले. आठवड्यात मला जाणवले नुसत्या मराठीत सूचना दिल्या तरी हिंदी-भाषिक मुलांना सर्व उपक्रम व्यवस्थित समजतात.

सुमारे पंधरा दिवसांनी मुलांच्या संमतीने आठवड्यातील एक दिवस हिंदी दिवस ठरवून, त्या दिवशी शाळेतील सर्व सूचना, संवाद हिंदीतच करायचे असे ठरविले. आठवड्यातील हिंदी दिवस आमचा शुक्रवारी साजरा व्हायला लागला.

सगळ्यांनीच त्या दिवशी हिंदी भाषेचा वापर करायचा होता. पहिल्या दोन आठवड्यांमध्ये फक्त हिंदी-भाषिक मुलेच जास्त बोलताना जाणवले. मराठी-भाषिक मुलांमधील यश, श्रुती, प्रतिक यांनीच तोडक्या मोडक्या हिंदीत संवाद केला. इतर मुले काहीच बोलली नाही. दोन्ही शुक्रवार शांततेतच गेले. पण तिसऱ्या शुक्रवारी मुलांमध्ये हिंदीमधील संवाद वाढलेले मला जाणवले. आपल्याला हिंदी येते या अविर्भावात मराठी-भाषिक बरीच मुले मराठी वाक्यात एखादाच हिंदी शब्द घालून बोलण्याचा प्रयत्न करायला लागली. हिंदी दिवस हा तोडक्या मोडक्या हिंदीतील संवादाचा दिवस म्हणून साजरा व्हायला लागला.

अक्षर ओळख

वस्तूंचे प्रदर्शन, चित्रांचे चार्ट व त्याखालील त्यांची दोन्ही भाषेतील नावे अशा वेगवेगळ्या प्रकारांमधून मुलांना शब्दांवरून उच्चारांकडे व उच्चारांवरून अक्षरांकडे नेल्यानंतर त्यांना वाचनाच्या आणखी एका टप्प्याजवळ नेले.

मुलांच्या दोन्हीही भाषांच्या शब्द भांडारातून एकाच उच्चाराने व अक्षराने सुरू होणारे शब्द एकत्रित करून त्यांचे वेगळे चार्ट तयार केले.

'आ' अक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांचा चार्ट उदाहरणादाखल दिला आहे.



वर दाखविलेल्या चार्टमधील सर्व शब्द मुलांकडूनच आलेले आहेत. हिंदी व मराठी भाषेतील शब्दांच्या सुरुवातीचे उच्चार एकच असलेले शब्द गोळा केले आणि जे ऐकले ते डोळ्यांनी कसे दिसते याची ओळख मुलांना करून देता आली.

चार्ट तयार झाल्यावर, चार्टच्या खाली त्या उच्चाराच्या शब्दांच्या वस्तूंचे प्रदर्शन भरवायला सुरुवात केली. बोर्डवर 'आ' च्या प्रथम उच्चाराचे शब्द लिहिले होते, त्याखाली त्याच अक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांची आणखी चित्रे व चित्रांबरोबर दोन्ही भाषांमधील त्यांची नावे (दोन्ही भाषेतील नावाचा पहिला उच्चार सारखा असेल तरच) व सगळ्यात खाली चार्टमधील अक्षराने सुरू होणाऱ्या नावाच्या सापडतील तितक्या प्रत्यक्ष वस्तू व त्यांची दोन्ही भाषेतील नावे अशाप्रकारे एकत्रित लावलेले प्रदर्शन आठवडाभर ठेवले. या प्रदर्शनाचा खूपच फायदा झाला. कारण प्रदर्शनात मांडलेल्या वस्तूंची व चित्रांची ओळख या आधी झाली होती. उच्चारातील साम्य दाखवून उच्चार व अक्षराची सांगड घालणे आणि अक्षरओळख करून देणे मला सहज शक्य झाले. हिंदी-भाषिक मुलांना अक्षर ओळख कशी करून द्यायची या मुख्य प्रश्नाचे उत्तर मला मिळाले होते. अशा प्रकारे मला वाटले होते त्यापेक्षा खूपच चांगला प्रतिसाद मुलांकडून मिळाला.

समाधानाची गोष्ट म्हणजे कुरेशीनगरमधून आलेल्या मुलांना पण इतर मुलांच्या बरोबरीनेच सुरुवातीचे अक्षर व त्याच्या उच्चाराची ओळख झाली. हिंदी शब्दांची मदत जाणीवपूर्वक घेतल्याने 'कछुआ' म्हणजे सुरुवातीच्या अक्षराचा उच्चार 'क' हे मुलांच्या चांगले लक्षात आले.

दोन्ही भाषांमधील एकाच अर्थाच्या गाण्यांचा वापर

लहान मुले सारखी काहीतरी गुणगुणत असतात. मुलांनी ऐकलेल्या गाण्याच्या पूर्ण ओळी येत नसल्या तरी काही शब्द म्हणत, गाण्यात काही आपल्या मनाचे शब्द घालत, तालात ते गाणे गुणगुणणे म्हणजे त्यांचे आवडते काम. त्यातून कधी कधी त्यांचे स्वतःचे गाणेही तयार होते.

बालवाडीत गाणी म्हणजे मुलांचा शब्दसंग्रह वाढवण्यासाठी मिळालेली संधी. बडबडगीतात यमक जुळणारे गाणे ऐकून, मुलेही आपल्या मनाची गीते तयार करायला लागतात याचा अनुभव बालवाडीच्या मोठ्या गटात खूप वेळा येतो. अभिनय गीत नृत्यासहित सादर करताना मुलांमधील नृत्याचे अंग ओळखता येते.

शाळेच्या सुरुवातीच्या काळात गाण्यामधूनच मुलांना उपक्रमाकडे घेऊन जाणे, मुलांना कंटाळा आला असेल तर बदल म्हणून एखादे अभिनय गीत घेणे असे बदल करावे लागतात. माझ्या उपक्रमांतर्गत मुलांना आवडणाऱ्या गाण्यांचा मी संग्रह केला. मुलांना आवडणाऱ्या मराठी गाण्यांचे हिंदीत भाषांतर केले. तसेच हिंदी गाणी मराठीत भाषांतरित केली. दोन्हीही भाषांमधील गाण्यांची मूळ चाल कायम ठेवली. प्रत्येक गाणे अभिनयासह कृतीयुक्तच असेल याची काळजी घेतली.

रोज गायली जाणारी गाणी कार्डवर लिहून मुलांसाठी तयार केलेल्या वाचनालयात लावून ठेवली. गाणी लिहिताना रंगीत स्केचपेनचाच वापर केला व गाण्याला अनुसरून पूरक चित्र त्याच कार्डवर काढले. त्यामुळे बोर्डवर लावलेल्या कार्डवरील गाणे मुले लांबून देखील ओळखू शकतात हे माझ्या लक्षात आले. रोज अभिनयासहीत घेतलेली गाणी, बडबड गीते (दोन्ही भाषेतील) मुलांना चांगली पाठ झाली आहेत हे लक्षात आल्यावर शाळेतील नियोजनातील काही वेळ वाचनालयातील कार्डवर लिहिलेली गाणी मुलांना वाचून दाखविण्यात घालवायचे ठरविले व त्याप्रमाणे रोज गाण्यांचे प्रत्यक्ष वाचनही मुलांना करून दाखविले. मुलांना पाठ असलेली मराठी व हिंदी गाणी वाचायला मुले लवकर शिकली व आपल्याला वाचायला येते याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसायला लागला.

द्विभाषेतील गाणी गाताना त्यातील पक्षांची, प्राण्यांची चित्रे दाखवली व त्यांची नावेपण सांगितली. याचा परिणाम चांगला झालाय हे मला कळले जेव्हा मी चित्रांचे चार्ट तयार केले व त्यावरील मराठी व हिंदी नावे मी वाचून दाखवली, त्यावेळी ओंकार व साहिलने गाण्यांची आठवण करून दिली. एका चार्टवर चिमणीचे चित्र होते व त्याखाली चिमणी व चिडीया अशी दोन्ही नावे होती. आणि याच चिमणीचे म्हणजे चिडीयाचे आम्ही रोज गाणे गात होतो व वाचत देखील होतो. त्यामुळे मुलांना नाव वाचून गाणे लगेच ओळखता आले.

'एक छोटी उंगली' हे गाणे प्रथम घेताना टिम टिम टिम असे म्हणत एका बोटाने दुसऱ्या हातावर टाळी वाजवायची असे कृतीयुक्त गाणे सगळ्यांनाच आवडते. पुन्हा पुन्हा म्हणून नंतर 'उपर रखो' असे म्हणे पर्यंत सगळ्यांची बोटे डोक्यापर्यंत जातात व 'नीचे रखो' म्हणताना फरशीवर ब 'गोदी में' म्हणल्यावर मी माझ्या ओढणीमध्ये हात ठेवायचे तसेच मुले पण 'गोदी में' असे म्हणल्यावर मुली फ्रॉकमध्ये, मुले शर्टमध्ये हात गुंडाळून घ्यायचे. एकदा आदित्यने 'गोदी में' म्हणल्यावर शर्टच्या खिशात हात घातला. असे गमतीदार प्रसंग बघून मलापण हसू आवरायचे नाही.

द्विभाषिक गाण्यांचा उपयोग करून हिंदी-भाषिक मुलांना मला संख्याज्ञान व एक-अनेक ही संकल्पना चांगल्या प्रकारे समजून देता आली. गाणी अभिनयासहित असल्यामुळे आवडीने कृती करून सगळेच गाणी गात होते. मुलांच्या सगळ्यात आवडीचे गाणे म्हणजे 'धम्मक धम्मक आता हाथी' गाणे शिकवतान, गाणे म्हणताना गाणे पूर्ण व्यवस्थित म्हटले जायचे पण आता हेच गाणे मुले गुणगुणताना, त्यात मराठी शब्द कधी आला ते मुलांच्यापण लक्षात येत नाही एवढ्या सहजपणे दोन्ही भाषांचा वापर होताना मी पाहिले. 'धम्मक धम्मक आता हाथी, धम्मक धम्मक गेला हाथी' असा सहज बदल करून गुणगुणताना मी साहिलला ऐकले होते. गाण्याची चाल एकच, पण गाण्यात त्याच अर्थाचे वेगळ्या भाषेतील शब्द घालून गंमतीदार मिसळ तयार करून गाणे म्हणल्याचे कौतुक वाटले.

एकादा 'चना कैसे बोया' हे कृतीयुक्त गाणे घेत असताना 'बाई बोया म्हणजे काय ओ?' म्हणून संजनाने विचारले. मग मी पूर्ण गाण्याचा अर्थ मराठीत समजावून दिला. त्यावेळी नवरात्र सुरू होणार होते. मग आम्ही मुलांना कडधान्य पेरायला दिली व पुढे काय होणार यावर चर्चा केली. महत्त्वाचे म्हणजे या चर्चेत आफताबचा सहभाग खूप जाणवला, त्याने लगेच त्याच्या मामाची माहिती मला सांगितली, त्याच्या मामाच्या घराजवळ 'खेत हाय' आणि सुट्टीत आफताब या शेतात जातो आणि ऊस खातो, हे पण आम्हाला सांगितले. हिंदी-भाषिक मुले अशी शाळेत रमली होती. शिकण्यात रस घेत होती.

द्विभाषिक गाण्याबरोबर वर्गात इतरही गाणी घेत होते. त्यातील मुलांना आवडणाऱ्या गाण्यांची कार्डे मुलांनी तयार करायला सांगितली. मी गाणी लिहून आणल्यावर मुले ती स्वतः वाचायचा प्रयत्न करतात हे मला जाणवले.

शब्दसंग्रह वाढविणे

माझ्या उपक्रमांतर्गत काम करताना, मला जाणवले की मुलांना मराठी भाषेची चांगली ओळख होण्यासाठी प्रथम शब्दसंग्रह वाढायला हवा. मुले बालवाडीतील असल्यामुळे विशेष, वेगळ्या पध्दतीने शब्दांची ओळख व्हायला हवी, जी मुलांना सहज अनुभवता येईल. माझ्याकडे मराठी व हिंदी भषेची मुले आहेत त्यामुळे दोन्ही भाषेतील शब्दसंग्रह वाढला, तर ती दोन्हीही भाषांमधून बोलू शकतील आणि पुढे मला अक्षरे शिकवताना दोन्ही भाषांमधील शब्द वापरता येतील.

सुरुवातीला मी शाळेच्या आवारातील विविध वस्तूंची त्यांच्या नावासहित ओळख करून द्यायचे ठरविले. प्रथम शाळेच्या आवारात सर्वात आधी दिसणाऱ्या दरवाजावर मी एक कार्ड लावले. कार्डावर लिहिले, 'दरवाजा' आणि 'दरवाजा' वर्गात आल्या-आल्या कार्डाकडे मुलांचे लक्ष जात होते. मुलांना दाराला मराठीत व हिंदीत काय म्हणतात हे सांगून कार्डवर लिहीलेली नावे वाचून दाखवली. दोन दिवसांनी मी दरवाजाजवळच असलेल्या आरशावर कार्ड लावले. कार्डावरील 'आरसा' 'आइना' हे दोन्हीही शब्द मुलांना वाचूनदाखविले. सतत नजरेसमोर दिसणाऱ्या वस्तूंवरील नाव मुलांच्या लक्षात यावे म्हणून प्रथम याच वस्तूंची नावे लिहिली. मग दुसऱ्याच दिवशी कपाटाला हिंदीमध्ये काय म्हणतात असे विचारल्याबरोबर कपाटाला लावलेल्या कुलुपाला हिंदीत काय म्हणतात असे मराठी-भाषिक मुलांनी विचारले. त्याच दिवशी मुलांसमोर 'कपाट – अलमारी' व 'कुलूप – ताला' अशी नावे लिहिलेली कार्डे त्या वस्तूंजवळ लावून टाकली आणि मुलांना कपाट व कुलपाला दोन्ही भाषेत काय म्हणतात हे पण सांगितले. सोनमने स्वतः पुढे येऊन कार्डवरील नावे वाचली.

अशा प्रकारे रोज एका नवीन वस्तूची ओळख दोन्ही भाषेत करून द्यायची व आधी झालेल्या वस्तूंच्या नावाची उजळणी मुलांकडून करून घ्यायची असा उपक्रम सुरू केला. अशा प्रकारे शिकलेल्या शाळेतील वस्तूंची यादी परिशिष्ट-४ मध्ये दिली आहे. उदा. घडी – उड्याळ पिशवी – थैली

वर सांगितल्या प्रमाणे बऱ्याच वस्तूंची ओळख मुलांना झाली. त्या वस्तूंना मराठीत व हिंदीत वेगळी नावे आहेत हे पण समजले. संपूर्ण वर्गात प्रत्येक वस्तूजवळ नावाचे कार्ड लावलेले होते. मुलांना सवयच लागून गेली. कोणतेही साहित्य वापरताना 'याला हिंदीत (किंवा मराठीत) काय म्हणतात' असे विचारून मुले स्वतः नाव जाणून घेत होती. व दोन्हीही शब्द अधूनमधून वापरण्याचा अट्टाहास करीत होती.

वस्तूंचे प्रदर्शन

पंधरा दिवस वर्गातील बहुसंख्य वस्तूंची ओळख झाल्यावर थोड्या वेगळ्या प्रकारे आणखी काही शब्दांची ओळख मुलांना करून द्यायचे ठरविले. ते म्हणजे प्रदर्शनाच्या माध्यमातून. शाळेत वेगवेगळ्या उपक्रमात, खेळात खूप वेगवेगळे साहित्य बापरले जात होते. मुलांना आता सवयच लागली होती की प्रत्येकाचे नाव विचारायचे. म्हणून शाळेच्या वेळात उपक्रमांतर्गत ज्या वस्तू सतत बापरात येतात त्यांची ओळख मुलांना वस्तूंच्या प्रदर्शनाद्वारे करून द्यायची ठरविली.

सुरुवातीला प्रत्यक्ष वस्तू प्रदर्शनात मांडून, त्याजवळ मराठी व हिंदीमधील त्या वस्तूच्या नावाची कार्डे ठेवली. या प्रदर्शनामध्ये मुलांमधील प्रतिनिधी वस्तूंची ओळख करून देतील व नावांचे कार्ड वाचून दाखवतील असे ठरवून, या सर्व नियोजनाची कल्पना मुलांना करून दिली. मुक्त खेळासाठी उपक्रम मांडले जातात त्याचप्रमाणे प्रदर्शनासाठी एक कायमचाच कोपरा तयार केला. त्यात नवीन ओळख झालेली वस्तू व तिचे नाव लिहून ठेवायचे.

प्रदर्शनाच्या सुरुवातीला, प्रदर्शन कोपऱ्यात एकच वस्तू ठेऊन, मुलांकडून त्याचे मराठी व हिंदी नाव विचारून घेतले आणि समोर लिहून ठेवले. दोन दिवसानंतर प्रदर्शनात दोन नव्या वस्तू ठेऊन त्यांची नावे विचारून लिहून ठेवली आणि पुन्हा वाचून दाखविली. मग नंतर मुले स्वतः खेळात व इतरत्र उपक्रमात वापरलेल्या वस्तूंची मांडणी प्रदर्शनात करून त्याची नावे खाली लिहायला सांगायला लागली. वस्तूंची ओळख करून देताना हिंदी-भाषिक मुले वस्तूचे नाव हिंदीत सांगायची व

मराठी-भाषिक मुले मराठीत नाव सांगायची.

एकदा अजून शाळा भरायची होती. लवकर आलेल्या सौफीयाने आल्या-आल्या माझ्याकडे येऊन 'बाई गुडीया दो ना' असे म्हणत बाहुली मागितली. सोनम बाजूलाच होती. तिने मला लगेच विचारले 'कसली गुडीया बाई?' सौफिया म्हणाली, 'अरे बाबा गुडीया याने बाहुली. हो ना?' सोनम 'बाहुली व्हय' असे म्हणत हसत निघून गेली.

त्या दिवशी प्रदर्शनाच्या कोपऱ्यात बाहुली ठेवली व जवळच 'बाहुली–गुडीया ' लिहिलेले कार्ड ठेवले. मुलांना 'बाहुली' यापेक्षा 'गुडिया' हे नाव आवडले आणि त्या दिवसापासून वर्गातील सगळी मुले बाहुलीला गुडीयाच म्हणतात.

द्विभाषिक चार्ट तयार करणे

वर्गातील व नित्य वापरातील वस्तूंच्या हिंदी-मराठी नावांची ओळख करून दिल्यावर मी आता इतर वस्तू, प्राणी इत्यादींची दोन्ही भाषेतील नावांची ओळख करून दिली. त्याचबरोबर शब्दांच्या उच्चारांकडे आणि अक्षरांच्या वळणाकडे लक्ष वेधण्यासाठी चित्र, मराठी नाव व हिंदी नाव असलेले चार्ट तयार करून वाचण्याचा नवीन उपक्रम केला. सुरुवातीला चर्टवर एकच चित्र लावले. मुलांच्या आवडीचा हत्ती, नजरेत ठसठशीत दिसणारा प्राणी. हत्तीचे मोठे चित्र मोठ्या कागदावर लावले व त्याखाली त्याची हिंदी व मराठी मधील नावांची कार्डे लावून ठेवली. प्रत्येक वस्तूला, प्राण्याला, व पक्ष्यांला दोन नावे असतात हे आता मुलांना पक्के माहीत झाले होते.

हत्तीचा चार्ट आठवडाभर बोर्डवर लावून ठेवला. सुरुवातीला चार्ट लावल्यावर, मुलांना नाव वाचून दाखविताना दोन्ही भाषेत असलेल्या नावातील उच्चारामध्ये बारीकसा बदल आहे हे मला मुलांना जाणवून द्यायचे होते म्हणून हत्तीचे नाव वाचून दाखवताना 'ह' चा प्रथम उच्चार दोन्हीकडे सारखा आहे पण नावातील दुसऱ्या अक्षराचा उच्चार दोन्ही भाषेतील नावात वेगळा आहे हे मी रोज वाचन करून मुलांच्या मनावर ठसविले. मुलांच्या वाढलेल्या शब्दसंग्रहातूनच मला अक्षरांच्या उच्चारांकडे, शब्दांकडे सहज घेऊन जायचे होते.

पुढचे चित्र होते 'हरीण'. गेल्या आठवडाभरात 'हत्ती' शब्दाचे वाचन करताना शब्दातील दोन वेगवेगळ्या उच्चारांची चांगली जाणीव झाल्यामुळे, 'हरीण' या शब्दाचे वाचन करताना, मी एकेका अक्षरावर बोट ठेऊन उच्चार करते याकडे सगळ्यांनी व्यवस्थित लक्ष देऊन वाचन केले. आपण जे नाव वाचतो आहे, जे ऐकायला येते आहे, ते कार्डवर लिहिल्यावर कसे दिसते आहे हे मुलांना मला समजावून द्यायचे होते. आधी झालेल्या 'हत्ती' मधील 'ह' व 'हरिण' मधील 'ह' यांचे उच्चार सारखे आणि ते दिसायलाही सारखेच आंहेत हे मुलांनीच मला सांगितले.

चार्टवरील चित्रे हळूहळू वाढवीत नेली. एका चार्टवरील चित्रांची नावे एकाच अक्षरापासून तयार झालेली आहेत याची काळजी घेतली. चित्रांच्या चार्टमधून नावांची ओळख करून देताना हिंदी-भाषिक मुलांनीही, दोन्ही भाषांमधील शब्दांच्या सुरूवातीच्या अक्षराचे वळण लक्षात ठेऊन त्याचे उच्चार पण व्ययस्थित लक्षात ठेवले आहेत हे जाणवले.

चार्ट लावण्याचा फायदा सौफीया, जोहरिया, आफताब यांना चांगला झाला. चित्रे माहितीची असल्यामुळे चित्रे बघत खाली असलेली नावे वाचायचा प्रयत्न मुले करायला लागली. चित्रांचे चार्ट मुलांना रोज दिसत होते. पहिले चार दिवस, शाळेच्या नियोजनातच चार्टचे वाचन करण्यासाठी काही वेळ दिला व नवीन चार्ट लावल्यावर त्याची ओळख व वाचन मुलांना करून दाखवत होते. त्यानंतर मुलेच आपल्याला वेळ मिळेल तेव्हा चार्टजवळ जाऊन चित्रांच्या दोन्ही नावांवर बोट ठेऊन वाचन करीत होती. मी अजूबाजूलाच असल्यामुळे अडचण आली तर थोडी मदत करीत असे.

मुलांना शब्द उच्चारताना उच्चारांची ओळख होत होती. अक्षरावर बोट ठेवत एक-एक अक्षर वाचल्यामुळे अक्षराचे वळण आणि अक्षर-उच्चार नातेही मुलांना कळले. त्यानंतर 'म' पासून सुरू होणाऱ्या नावांच्या चित्रांच्या चार्टचे वाचन करीत असताना मुलांनी आपल्या नावात किंवा एखाद्या परिचयातील, वस्तूच्या नावात 'म' कोठे आहे हे मला स्वतःहून सांगितले.

वर्गात असलेल्या सोनम ने बाई माझ्या नावात पण 'म' हाय असे म्हणत मला तिच्या नावाचे कार्ड आणून दाखविले. अशाच प्रकारे 'च', 'झ', 'आ', 'क', 'य' अक्षरांनी सुरू होणाऱ्या नावांची चित्रे असलेल्या कार्डाचे चार्ट तयार केले.

वर्गात चालू असणाऱ्या प्रकल्पानुसार मी त्यातील घटकांच्या नावांचे हिंदी-मराठी चार्ट तयार केले. उदा. फळे हा प्रकल्प चालू असताना फळांची चित्रे व त्यांची दोन्ही भाषेतील नाव. याप्रमाणे रंग, शारीरिक अवयव, फळभाज्या, प्राणी, कीटक असे अनेक चार्ट तयार झाले. शारीरिक अवयवांची ओळख प्रथम प्रत्यक्ष कृतीतून करून दिली आणि नंतर चित्रांचे चार्ट तयार केले. फळे, फळभाज्या यांची प्रथम प्रत्यक्ष दाखवून ओळख करून देऊन नंतर चित्रांचे चार्ट तयार केले.

गोष्ट आणि पुस्तक वाचन

बालवाडीतील मुलांना वेगवेगळ्याप्रकारे गोष्टी सांगितल्या जातात. गोष्टी ऐकायला सगळ्याच मुलांना खूप आवडते. गोष्टीमधून शब्दसंग्रह वाढतो, अवधान वाढते. तसेच मुलांच्या कल्पनाविश्वाचा विकास होण्यासाठी गमतीदार गोष्टींचा भरपूर साठा बालवाडीत ठेवावा लागतो. माझ्या उपक्रमाचा भाग म्हणून मला मुलांना मराठी व हिंदी या दोन्ही भाषांची ओळख करून देण्यासाठी व शब्दसंग्रह वाढविण्यासाठी गोष्टी हे खूप मोठे साधन वाटत होते. मी गोष्टी तोंडी सांगताना मराठी व हिंदी शब्दांचा वापर बरोबरीने करत मुलांसमोर गोष्टी सादर करीत असे. कारण मराठीत गोष्ट संगितली तर हिंदी भाषिक-मुले कंटळतात असे मला आढळले होते. म्हणूनच या उपक्रमांतर्गत काम करताना जाणीवपूर्वक हा बदल केला. हिंदी-भाषिक मुलांना सहज मराठीकडे आणायचे होते, त्यासाठी थोडी मदत हिंदीची घ्यायलाच हवी होती.

माझ्या गटात येणारी मुले पुढे पहिलीत जाणार असतात त्यामुळे त्यांना वाचनाकडे घेऊन जावे लागते. म्हणून गोष्टीचे वर चित्र व खाली गोष्ट असे कार्ड मुलांना दाखवत गोष्ट वाचून दाखवण्यापासून सुरुवात केली. पाच ते सहाच कार्डे असलेल्या व प्रत्येक कार्डवर दोन ओळींपेक्षा जास्त लिखाण नसलेल्या गोष्टी प्रथम सांगितल्या. गोष्टीच्या कार्डवरील चित्रातील प्रसंगच खाली लिहिलेला असल्यामुळे समोर दिसणारे चित्र व त्याची खाली लिहिलेली गोष्ट प्रथम मराठीत वाचून दाखवून

त्याचा अर्थ हिंदीत समजावून सांगत होते. हिंदीत अर्थ समजावून देत असल्यामुळे हिंदी-भाषिक मुलांना गोष्ट पूर्ण समजायला चांगलीच मदत होत होती. उदा. ससा व कासवाची गोष्ट

मुलांना यापुढे मला पुस्तक वाचनाकडे घेऊन जायचे होते. आमच्याकडे असलेल्या 'चला वाचू या' या पुस्तकाच्या संचात पुस्तके मुलांना समजतील अशा मोठ्या अक्षरात लिखाण असलेली व वर चित्र असलेली १ ते १२ आहेत. पुण्याच्या सेंटर फॉर लर्निंग रिसोर्सेस या संस्थेतर्फे हा संच प्रकाशित झाला आहे. चित्रावरून मुलांना खालील लिखाणाचा संदर्भ लगेच समजतो. मराठीत उपलब्ध असणाऱ्या पुस्तकांची हिंदी भाषांतरीत 'हम पढे' या पुस्तकांचा फार उपयोग झाला.

प्रथम 'चला वाचू या' या संचतील 'माझा नवा डबा' हे पुस्तक वाचून दाखविले. पुस्तकाची ओळख करून देताना मुलांना पुस्तक उघडायचे कसे, पुस्तकाची काळजी कशी घ्यायची आहे या प्राथमिक सूचना प्रत्येक पुस्तक वाचनावेळी करून देत गेले. पहिले पुस्तक 'माझा नवा डबा' वाचून दाखविल्यावर दुसऱ्या दिवशी हिंदी मधील 'मेरा नया डिब्बा' वाचून दाखविले. या आधी गोष्ट सांगताना मी मराठीतील गोष्टीतील काही वाक्ये हिंदीमध्ये परत सांगत होते. तसेच कार्डवरील गोष्ट वाचताना मराठीबरोबर त्याच अर्थाची हिंदी वाक्ये वाचनाचा सराव मुलांना झाला होता. त्यामुळे दहा-बारा पानाचे पुस्तक वाचताना मुलांना कंटाळा येत नव्हता. यमक साधला जाईल असे शब्द असल्यामुळे मुलांच्या लक्षात रहायला मदत होते हे जाणवत होते. 'मेरा नया डिब्बा' चे वाचन करताना हिंदी-भाषिक मुले खूप लक्षपूर्वक ऐकत होती. दोन्ही भाषेतील एकच पुस्तक वाचन झाल्यावर दोन्ही पुस्तकातील एकाच अर्थाच्या मराठी व हिंदी शब्दांच्या याद्या बोर्डवर लावून ठेवल्या.

उदा. माझा नवा डबा	मेरा नया डिब्बा
नवा	नया
डबा	डिब्बा
आत	अंदर

या याद्या दररोज वाचून घेत असे. पुढच्या पुस्तकाचे वाचन झाल्यावर डब्याला हिंदीत काय म्हणतात? किंवा अंदर ला मराठीत काय म्हणतात असे प्रश्न मुलांना विचारून याद्या तयार केल्या. याचप्रमाणे प्रत्येकवेळी दोन्ही भाषेतील पुस्तक वाचन झाल्यावर त्याचे दोन्ही भाषेतील नाव वर लिहून त्या त्या भाषेतील शब्द खालील अशा याद्या लवून ठेवल्या.

पुस्तक मराठीत वाचून झाल्यावर दुसऱ्या दिवशी त्याच हिंदी पुस्तकाचे वाचन झाल्यावर मुलांनाच विचारून 'डब्याला हिंदीत काय म्हणतात?' किंवा 'अंदरला मराठीत काय म्हणतात?' असे प्रश्न विचारत शब्दांची यादी तयार व्हायची आणि मग कार्डवर ते शब्द लिहून मुलांकडून ते रोज वाचून घेत होते.

अशाच प्रकारे आठवडाभर दोन्ही भाषेतील एकच पुस्तक मुलांच्या समोर ठेवले. पहिल्या दिवशी मराठी, दुसऱ्या दिवशी हिंदी, तिसऱ्या दिवशी बोर्डवर केलेली पुस्तकातील शब्दांची यादी वाचून दाखवीत असे. शब्द वाचत असताना शब्दाला अनुसरून कोणते वाक्य आले याची मुलांना आठवण करून देत असे. चौथ्या दिवशी मुलांमधील प्रतिनिधीना शब्द वाचायला सांगत असे. त्यावेळी मी मुलांमध्ये बसून त्यांच्या येणाऱ्या प्रतिक्रिया मला अनुभवत असे. शब्द वाचत असताना मुले स्वतःहून संदर्भासाठी वाक्ये सांगतात का, मराठीतील वाक्याबरोबर त्याच अर्थाची हिंदी वाक्ये मुले कशी बोलतात हे बघायची संधी मिळली. पाचव्या दिवशी लायब्ररीमध्ये दोन्ही पुस्तके वाचनासाठी ठेवली. आठवड्यात मुलांना दोन्हीही पुस्तकांची चांगलीच ओळख झाली होती.

पुस्तकाचे वाचन करताना मुलांना स्वल्पविराम, पूर्णविराम याची ओळख करून दिली. आपण वाचू या च्या पुस्तकाचे वाचन झाल्यावर, पुस्तकातील कृती करायला मुलांना संधी दिली. उदा. साबणाचे फुगे (साबुण के बुलबुले) या पुस्तकामध्ये साबणाचे फुगे कसे करायचे व फुगा कुठे जातो, ते सर्व मुलांना स्वतःला अनुभवण्याची संधी दिली.

वेगवेगळ्या प्रकारे कानावर येणारे शब्द मुलांना नजरेसमोर दिसतील असे लावत गेले. बारा पुस्तकांचे दोन्ही संच चांगल्याप्रकारे मुलांसमोर देता आले. सर्व पुस्तकांचे वाचन झाल्यानंतर सर्व हिंदी व मराठी पुस्तकांचा संच मुलांच्या वाचनालयात त्यांना सहज उपलब्ध होतील असे ठेवले. आता मुलांना दोन्ही भाषेतील सर्व पुस्तके व्यवस्थित वाचता येतात. मराठी पुस्तक हिंदीमध्ये व हिंदी मराठीमध्ये असे बरेच प्रयोग मुले करतात. दोन्ही भाषांचे मिश्रणही करतात.

मी वापरलेल्या सर्व पुस्तकांची यादी व त्यातील शब्दांची यादी परिशिष्ट ३ मध्ये दिली आहे.

संस्कृतीची देवाण-घेवाण

मुलांना आपण अनुभवलेल्या सणांबद्दल, सोहळ्यांबद्दल किंवा लग्न समारंभाबद्दल बोलायला व इतरांना सांगायला आवडते. आमच्या शाळेत आम्ही मुलांना परिसरात साजऱ्या होणाऱ्या सणांची माहिती अवर्जून देतो. माझ्या उपक्रमाचाच भाग म्हणून मी माझ्याकडे असलेल्या हिंदी व मराठी-भाषिक मुलांच्या सणांची माहिती स्वतः त्या मुलांनी शाळेत इतरांना सांगावी असा प्रयत्न केला या उपक्रमात पालकांची पण मदत घेतली.

दरवर्षी आम्ही मुलांना गणपती बघायला कुंभारगल्लीमध्ये घेऊन जातो. तिथे मुलांना प्रत्यक्ष गणपती बनवताना पहायला मिळते. गणपती उत्सवाच्या दरम्यान सर्व मुले गणपतीपुढील डेकोरेशन व रोशणाई बघायला गावात फिरतात. शाळेत येणाऱ्या कोणत्याच मुलाकडे गणपती बसवत नाहीत पण गावात गणपती बघून आल्यावर गणपती मोरावर बसला होता, त्याच्या जवळच उंदीर होता, हातात फूल होते, गणपतीचे तोंड हत्तीसारखे असते अशी बरीच माहिती मुलांनी मला सांगितली. त्यानंतर मीच त्यांना गणेशोत्सवाची माहिती दिली. अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जनाची मिरवणूक निघाली. दुसऱ्या दिवशी शाळेत आल्यावर धनराज म्हणाला, 'आमच्या जयंतीला पण असली मिरवणूक निघते.

लाईटिंग पण केलेली असते.' सौफीया म्हणाली, 'हमारे यहाँ गणपती नही होता। हम मुस्लीम है ना।' एकदम काहीक्षण मला काही बोलावे हे समजलेच नाही. मग मी म्हणाले, 'आपके मोहरम के वक्त ताबूत (डोले) होते है ऩा वैसे ही गणपती उत्सव होता है। ये लोग गणपती देखके आये है ना, तो वो बता रहे है।' त्यावर सौफीया म्हटली, 'हमने भी कल कोपरे पर लाईटिंग देखी थी।' गप्पा थांबल्या मुले मुक्त खेळासाठी आपल्या आपल्या गटात काम करायला लागली. माझ्या मनात विचार येत राहिले. सगळ्यांनाच एकमेकांच्या सणउत्सवांची माहिती असायला हवी. प्रत्येकानेच इतरांच्या सण सोहळ्यांचा आदर ठेवायला हवा, त्यामध्ये सहभागी होऊन माहिती घ्यायला हवी. 'आपली शाळे'त येणारी मुले जास्त अनुसूचित जाती व भटक्या जमातीं मधून व त्यातील काही कुरेशीनगरमधील मुस्लिम ओ. बी. सी. आहेत. शाळेत येणाऱ्या मुलांमध्ये अशी सर्वांच्या धर्माबद्दल, संस्कृती, सणांबद्दल माहिती झाली व त्यात पालकांचा सहभाग मिळाला तरी मुंगी एवढे तरी चांगले काम माझ्या हातून झाले असे मला वाटले.

१२ ऑक्टोबरला धम्म प्रवर्तन दिन येणार हे लक्षात होते. माझी सहकारी आशाताई याच समाजातील असल्यामुळे तिला धर्माची व तो दिवस का साजरा करतात हे माहीत होते. त्या दिवशी मुलांनी शाळेत आल्याबरोबरच 'आम्ही बुध्दवंदनेला गेलो होतो. मेणबत्ती लावली.' अशा गप्पा मारायला सरुवात केली. मग आशाताईंनी सोप्या शब्दात धम्म प्रवर्तन दिनाचे महत्त्व सांगितले. 'आजच्या दिवशी बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्मात प्रवेश केला. आज तुम्ही वंदना केली ना त्याचा अर्थ म्हणजे सगळ्यांबरोबर चांगले वागावे, कोणाला त्रास देऊ नये असे आहे.' मुले शांतपणे ते ऐकत होते. आफताब, सौफीया, जोहरिया शांत बसले होते त्यांना सांगितले मी त्यांना म्हणाले, 'आप नमाज पढते हो ना, उसी तरह ये सब वंदना करके आये है, उसके बारे में ही बातचीत कर रहे है' आपल्याला सगळे समजले म्हणत सगळ्यांनीच मान हलवली.

जेव्हा जेव्हा अशी संधी मिळेल तेव्हा मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत त्यांना एकमेकांच्या सणांची, सोहळ्यांची माहिती करून द्यावी असे मला वाटते. मुलांना सर्व समजत असते व त्यांच्या पध्दतीने ते घडलेल्या घटनेचा अर्थ लावीत असतात. आपले काम असते मुलांना योग्य मार्गदर्शन करणे व त्यांना वेगवेगळे चांगले अनुभव देणे.

माझ्याबरोबर सुरुवातीच्या काळात काम करणाऱ्या माझ्या सहकारी नजमा मणेर उर्फ भाबी यांना कुराणाबद्दल खूप चांगली माहिती आहे. कुरेशीनगरमध्ये कुराण वाचायला, शिकवायला त्या जायच्या. त्यांच्यामुळे मला या धर्मातील सणांची खूप माहिती मिळाली. आमच्या दोघींची यावर बऱ्याचवेळा चर्चा होत असे. सगळ्याच धर्माची शिकवण एकच आहे, फक्त भाषा वेगळी हे सगळ्यांना समजले तर किती चांगले होईल, कुठे भांडणे, दंगे होणार नाहीत असे आम्ही म्हणायचो.

२१ सप्टेंबरला रमजान ईद होती. यावेळी पण ईदची माहिती सांगायचे मी ठरविले होते. या ईदला रोजे ठेवले जातात, हे मला माहीत होते. कारण मला स्वतःला शिरखुरमा खूप आवडतो त्यामुळे रमजान ईद माझ्या चांगलीच लक्षात असते. ईदच्या आधी दहा बारा दिवस आम्ही मुलांना मुक्तखेळ दिला होता. कोण काय करते हे मी पहात होते व कुठे मदत लागली तर ती करत होते.



लाकडी ठोकळ्यांच्या इथे सौफीया काय करते हे मी बघायला गेले. बरेच छोटे-छोटे भाग जोडून तिने एक आकार तयार केला होता. मी विचारले, 'ये क्या बनया है?' सौफीया उत्तरली, 'मज्जीद बनाई' मी म्हणाले, 'अरे वा ! बहोत अच्छी बनाई है मज्जीद। आप क्या करते हो मज्जीद में?' 'नमाज पढती याँ।' बोलत बोलत तिचे हातातले काम चालूच होते. 'अम्मीने रोजे रखे है। घर में हम नमाज पढती याँ। नमाज पढने से अल्ला हमको जल्दीसे बडा करेगा।' थोडावेळ थांबून पुढे म्हणाली, 'उसका हाथ बहोत लंबा होता हैं ना उससे हमको बडा करता है।' मुक्तखेळ झाल्यावर मी सौफीयाला सांगितले, 'रमजान ईद पर आप सब क्या करने वाले हो, हमको सब बताओं ना।' मुलांना पण सांगितले, 'आपल्याला सौफीया रमजान ईदविशी काय करणार आहेत ते सांगणार आहे. आपण शांतपणे ऐकूया बर का.'

सौफियाला पुढे येऊन सांगायला खूप आवडते आणि ते हिंदीमध्ये सांगायला सांगितले तर एकदम

खूष. त्याप्रमाणे तिने लगेच स्वतःला बसायला डेस्क घेऊन सांगायला सुरुवात केली.

सौफीयाः हम न नये कपडे सिलाते हैं।

मीः तुमने रोजा रखा है?

सौफीयाः नहीं न बच्चे नहीं रखते रोजा, मैं बडी होती तो रोजा रखती।

मीः आप और क्या क्या करोगे?

सौफीयाः नमाज पढेंगे, मेहंदी निकालेंगे, नई कपडे लायेंगे, अजी सुनो (जोहरियाला उद्देशून) तू बोल तो।

जोहरिया पुढे येऊन बोलत नाही. मैत्रिणींमध्येच बोलते. एकटीबरोबर आपण बोलले तर जागेवर बसूनच बोलते. जोहरिया (सुमो) नुसती हसली. म्हणाली 'तू बोल ना।'

मी : आप ईद के दिन क्या खाना बनाते हो?

सौफीयाः हम न शिरखुरमा बनाते।

मी: शिरखुरमा कैसे होता है?

सौफीयाः मीठा होता हैं।

आफताबः बाई, दूध से बनाते।

सौफीयाः दूध नहीं खाली। शेवइयाँ भी होती न दूध में काजू खिशमिश भी डालते।

सौफीया बोलत होती आणि सगळे कान लावून ऐकत होते. त्यांच्यामध्येच बसलेला सूरज म्हणाला, 'अनुरागच्या घरी दूध घ्यायला सौफिया येते.'

सौफीया, 'नहीं बाई, दिदी के साथ कभी कभी जाती। झूठी बाता बता रहा है।'

शाळेच्या दुसऱ्या दिवशी लोक नमाज पढतात असा फोटो कार्डवर लावून त्याखाली सौफीयाने सांगितलेली माहिती लिहिली. हे कार्ड बोर्डवर लावल्यानंतर ईद होईपर्यंत रोज सौफीया, जोहरिया, आफताब, जिया ते बघून खाली लिहिलेले वाचायचा प्रयत्न करीत होते.

कुरेशीनगर मुहल्ला सक्तीने दूर ठेवल्यासारखा आहे. तेथिल स्त्रिया बुरख्याच्या प्रथेमुळे बाहेर पडत नाहीत. परंतु जोहरियाची आम्मी अधून मधून शाळेत यायच्या. जोहरियाची आम्मी मिरजच्या आहेत. जोहरियाचा मोठा भाऊ आलताब आमच्याच शाळेत होता. जोहरियाच्या, सौफीयाच्या आम्मीबरोबर बोलत असताना जाणवले की त्यांना देखील सगळ्यांबरोबर बोलायला, शाळेतील नवीन उपक्रमांची माहिती जाणून घ्यायला आवडते. त्यांच्या माहेरी सगळ्या जातीचे लोक त्यांच्या अजूबाजूला रहात होते. जोहरियाच्या आईने बोलून दाखविले, 'लग्न होऊन बारा वर्ष झाली. त्या बारा वर्षांत आमच्या कुरेशीनगरमध्ये काही बदल झाला नाही. आपल्या गोतावळ्यातच येणे जाणे, कोणाशीच कसला संबंध नाही. त्यामुळे आम्हाला कोणाशीच बोलता येत नाही. आता जोहरियाची मैत्रिण आदिती आहे त्यामुळे आमची मुलगी त्यांच्या घरी जाते व आदिती पण आमच्याकडे येते. खूप चांगले वाटते.' जोहरिया व आदिती एकाच गटात असल्यामुळे छान मैत्री झाली आहे.

मिरजला मोहरम फार मोठ्या प्रमाणात साजरा करतात. म्हणून जोहरियाच्या अम्मीला 'मोहरमची माहिती मुलांना सांगायला याल का' असे विचारल्यावर त्यांना खूप आनंद झाला. 'सगळ्या मुलांसमोर मला माहिती सांगायला जमेल का?' असे म्हणत म्हणत त्या यायला तयार झाल्या. मी सांगितले, 'तुम्ही मोहरम कसा साजरा करता, त्याबद्दल सांगा. ताबूत, त्याची पूजा, त्याची मिरवणूक, नैवेद्य याबद्दल मुलांना सांगा. गणपतीसारखेच मोहरममध्ये ताबूत मशिदीपाशी बसविलेले मुले बघतात. त्याची माहिती सगळ्यांना हवी असे मला वाटते.

२४ डिसेंबरला आम्ही सर्व मुलांन घेऊन ताबूत दाखवायला घेऊन गेलो. आफताब आम्हाला रस्ताभर सांगत होता, 'आम्ही इथे नमाजीला येतो. कुराण भी पढाते है' किती सांगू आणि किती नको असे तिघांना झाले होते. मशिदीच्या बाहेरच ताबूत होते.

प्रतिकः बाई, देवळासारखेच शिखर हाय

आफताबः वर बघ चाँद हाय ना.

ताबुतापुढे धूप जाळला होता. 'बाई कसला भारी बास येतोय' प्रतिक्षा म्हणाली, आमच्या दुकानवर फकीर येतो ना, त्याच्याकडे असचं धुराचं भांड असतं, हातात काहीतरी बाजवत येतात, आणि पैसे घेऊन जातात.' यश ताबूत दाखवत म्हणाला, 'बाई, याचे काय करणार?' मी म्हणाले, 'मोहरम झाल्यावर विसर्जन करणार. गावातून आधी मिरवणूक निघेल मग विसर्जन.'

दुपारी जोहरियाच्या अम्मीला बोलावले होते. मुले ताबूत बघून आली होती त्यामुळे त्यांनी संगितलेली माहिती मुलांना लगेच समजली. जोहरियाच्या अम्मीने मिरजला केवढे मोठे ताबूत असतात त्याची माहिती दिली.

'आमी ताबूत को शरबत का और चपातीचा मलिदा करतो त्याचा नैवेद्य देतो. शरबत खूब चांगले असते. तुम्ही लिंबाचे शरबत पिताना? तेच्यात आमी आणि बडीशेप, वेलची घालतो. आमी या मोहरमला नवीन कपडे घेत नाही, उलट जे गरीब आहेत आमच्या समाजात त्यांना काही खायला देतो. नमाज तर आम्ही रोज पढतो, पण मोहरमच्या दिवशी पाच वक्त नमाज पढतो.'

मुलांना समजेल अशा शब्दांत मोहरमची माहिती भाभींनी सांगितली. मुले शांतपणे ऐकत होती. जोहरिया खूप खूष होती. तिची अम्मी आली होती ना शाळेत!

दुसऱ्या दिवशी सकाळ पेपरमध्ये मिरजच्या ताबुतांचा फोटो आला. मी मुलांना फोटो दाखवून काल सांगितलेल्या माहितीची आठवण करून दिली. सोनम म्हणाली, 'आपण बघितलेला किती छोटा होता बाई ताबूत' 'बाई, एवढी गर्दी असतीया व्हय?' मी हसले, 'हो मिरवणुकीला एवढी गर्दी असते. वेगवेगळ्या गावचे लोक हा उत्सव खास बघण्यासाठी येतात.'

या सर्व उपक्रमांमध्ये मुलांचे सहकार्य चांगले मिळाले. एवढ्या सहजपणे सगळेजण या सणांची ओळख करून घेतात, याचे मला खरेच समाधान वाटले आणि हा सहजपणा येण्यासाठी सुरुवातीपासूनच केलेले नियोजन महत्त्वाचे आहे हे मला जाणवले. या सर्व उपक्रमांतर्गत आफताब, जोहरिया, सौफीयामध्ये आत्मविश्वास वाढतोय हे मला प्रकर्षाने जाणवले.

सादरीकरण

आपल्या सवयीची नसलेली भाषा बोलताना कोणालाही जरा अवघडल्यासारखे होते. या अवघडलेपणावर मात करण्यासाठी नाट्यीकरण हा चांगला मार्ग आहे. येथे आपल्याला डोके लढवून, विचार करून, आपल्या शब्द भांडारातून शब्द काढायची गरज नसते. बाक्य रचना बरोबर आहे का त्याची चिंता करण्याचे कारण नसते, दुसऱ्या कोणीतरी लिहिलेल्या ओळी पाठ करून रोजच्या सरावात नसलेल्या भाषेतही आत्मविश्वासाने बोलता येते.

बालवाडीसाठी वर्गात सांगितलेल्या गोष्टीचेच नाटक केले. प्रत्येकाला नाटकात भूमिका देऊन त्या नाटकातील पात्राप्रमाणे काय बोलायचे याचा सराव घेतला. मी निवडलेली गोष्ट होती 'उंदराची टोपी'. 'उंदराची टोपी' ही गोष्ट मुलांना माहीत होती. परंतु नाटक म्हटल्यावर संवाद महत्त्वाचे. माझ्या प्रकल्पातील हा एक महत्त्वाचा भाग असल्यामुळे नाटकातील काही संवाद हिंदीत तर काही मराठीत असावेत याची काळजी घेतली. वर्गात नकळत एकमेकांची भाषा बोलणारी मुले आता आपापले हिंदी-मराठी संवाद सर्वांच्यासमोर आत्मविश्वासाने सादर करतील याची खात्री होती. संवाद गाण्याच्या रुपात, यमक साधून तयार केल्यामुळे संवादात सहजता येईल याची काळजी घेतली होती.

नाटकाचा महत्त्वाचा भाग म्हणजे पात्र. मुलांना सर्व येत असले तरी काही मुले पुढे येऊन ते सांगू शकतात तर काही मागे राहतात. मागे राहणाऱ्या मुलांना आत्मविश्वास येण्यासाठी कधी कधी एक संधी देखील पुरेशी असते. सौफीया व सुमो दोघीही हिंदी-भाषिक. पण सौफीया पुढे येऊन काहीही करायला, सांगायला तयार असते तर सुमो कायम मागे. सुमोने (जोहरिया) पुढे येऊन नाटकात काम करावे अशी माझी इच्छा होती. प्रथम तर तिने नाटकात काम करायला नकारच दिला. बऱ्याच समजावणीनंतर ती तयार झाली. नाटकातील संवाद व पात्रांची निवड केली.

जोहरिया (सुमो) – उंदीर

श्रुती – धोबीदादा

सौफीया – रंगवालेदादा

धनराज – शिंपी

प्रतिक – गोंडेवालेदादा

आफताब – राजा

सुजल, ओंकार – सैनिक

नाटकातील प्रमुख भूमिका जोहरियाची, उंदराची होती. जोहरियाला हिंदी व मराठी दोन्ही भाषांमध्ये संवाद दिले.

श्रुती व प्रतिकने जोहरियाबरोबर हिंदीतच बोलायचे तर सौफीया व धनराज मराठीत बोलणार होते. नाटकात येणारी वाक्ये तीच तीच येत होती. मराठीत म्हणलेलेच वाक्य हिंदीत येईल असेच संवाद मुलांकडून करून घेतले होते.

जोहरियाला दोन वाक्यांमधील पहिले हिंदीत तर दुसरे मराठीत म्हणायचे होते 'धोबीदादा, धोबीदादा इसको धोके दो ना किंवा शिंपीदादा इसकी टोपी बनाओ ना, नंतरचे वाक्य प्रत्येकवेळी 'राजाकडे जाईन चार शिपाई आणीन काठीने चांगला ठोक ठोक देईन.' हेच असणार होते. हे वाक्य प्रत्येक वेळी म्हणावे लागत असल्यामुळे सरावादरम्यान चांगलेच पाठ झाले.

वर्षभर दोन्ही भाषांतील पुस्तके वाचून दाखवल्याने व एकमेकांशी मारलेल्या गप्पांमुळे नाटकांचे सादरीकरण करताना मुलांमध्ये आपली मातृभाषा नसलेली भाषा बोलण्याचा चांगला आत्मविश्वास निर्माण झाला होता. सादरीकरणाच्याबेळी म्हणजे हिंदी भाषिकांनी मराठी व मराठी भाषिकांनी हिंदीमधील संवाद खूप सफाईदारपणे साधून उत्तम सादरीकरण केले.

अभ्यास प्रकल्पाचे परिणाम

'आपली शाळा' मध्ये बालवाडी शिक्षिका म्हणून काम सुरू केल्यानंतर नेहमी दूर एका गटात बसणारी, फारशी कुणाच्यात न मिसळणारी, बरीच गैरहजेरी असणारी, बहुतेक वेळा वर्षाच्या मधेच शाळा सोडून जाणारी, कुरशीनगरमधील मुले माझ्यासाठी चिंतेचा विषय होती. कुरेशीनगर मोहल्याला भेट दिल्यानंतर या साऱ्याची कारणे सांस्कृतिक व भाषिक आहेत हे हळू हळू माझ्या लक्षात येऊ लागले. शाळेत ही मुले त्यांच्याशी हिंदीतून बोलणाऱ्या नजमाभाभींकडे किती रमतात ते मी पहात होते. त्याने माझ्या मताला पुष्टीच मिळाली. मी विचार केला की अनेक अडचणी असून ही मुले जर शाळेपर्यंत येतात तर त्यांना यशस्वी होण्यास मदत करून शिक्षणाचा मार्ग दाखविणे हे शिक्षिका म्हणून माझे नैतिक कर्तव्य आहे.

कुरेशीनगरच्या मुलांना शाळेत आपलेपणा वाटावा म्हणून त्यांच्याच मातृभाषेतून मी त्यांच्याशी संवाद करीत होते. पण केवळ तेवढेच पुरेसे नव्हते तर बाकीच्या मुलांनीही तसा प्रयत्न करावा व खऱ्या अर्थाने देवाणघेवाण आणि शिकण्याची प्रक्रिया व्हावी यासाठी या प्रकल्पादरम्यान मी प्रयत्नशील होते. तसेच या दोन समाजांमधील मुलांनी शाळेबाहेरही एकमेकात मिसळावे, एकमेकांच्या घरी जावे, एकमेकांचे सण, वेगळेपणा समजून घ्यावा, यासाठीही मी प्रयत्न करायचा ठरवला. जणूकाही माझ्या वर्गापुरता तरी मी या दोन समाजांमधील दरीवर पूल बांधायचा ठरवीत होते. हा पूल बांधायचे माझे माध्यम होते भाषा— आदान प्रदान करण्याचे सर्वात प्रभावी साधन.

अभ्यासप्रकल्प सुरू असताना मी सतत मुलांचे निरीक्षण करीत असे. नोंदी ठेवीत असे. मुले काय व कशी बोलतात ते टिपून ठेवत असे. माझ्या टिपणांची मदत घेऊन मी सर्वांसमोर माझे निष्कर्ष मांडणार आहे.

हिंदी भाषिक मुलांना समजावे म्हणून मी मुद्दाम हिंदीतून बोलत असे. तसेच माझी मुलेही एकमेकांना समजावे म्हणून मुद्दाम त्याची/तिची भाषा वापरण्याचा प्रयत्न करीत असत. एकदा लेखनाच्या कोपऱ्यात मुले स्वतःचे काही लिखाण करीत बसली होती, 'तुम्ही काय लिहिता आहात?' हे मी विचारत होते. मध्येच कोणी शू लागली म्हणून, पाणी प्यायचे म्हणून उठत होते. माझ्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मी बाथरूमकडे चक्कर मारायला गेले. तिथे आदिती आणि जोहरियाचे बोलणे ऐकू आले म्हणून मी तिथेच थांबून त्यांचे बोलणे ऐकू लागले. जोहरियाच्या तोंडाला स्केचपेनची शाई लागली होती.

आदिती : दगले में से घासते.

छान छान दिसते.

जोहरिया : रंग नही निकल रहा.

आदिती : अच्छी तरह घिसते.

बोलत बोलत आदिती जोहरियाला पाणी देत होती. मग जोहरियाने रुमालाने तोंड पुसले व स्केचपेनचा रंग निघाला का हे वर्गात येऊन आरशात बघितले. दगडाने घास हे आपले म्हणने जोहरियाला समजावे म्हणून आदितीने आपल्या परीने 'दगले में से घासते' असा हिंदीचा वापर केला होता.

केवळ एकमेकांसाठीच नव्हे तर मला समजणार नाही म्हणून जियाने मलाही मराठीतून समजावण्याचा प्रयत्न केला होता. जिया दोन तीन दिवस शाळेत आली नाही म्हणून जेव्हा ती शाळेत आली त्यावेळी मी तिला विचारले, 'कल क्यों नहीं आयी स्कूल में?' जिया म्हणाली, 'मेरा भावाला पोरगी हुआी थी, इसलिऐ नव्हती आली हुती शाळेत.' मला समजावे म्हणून हिंदीमध्ये मराठी शब्द वापरून जिया माझ्याशी बोलली याचे मला कौतुक वाटले. शिक्षकांनी आवर्जून दोन्ही भाषा वापरल्याचा हा परिणाम.

माझ्या निरीक्षणांच्या दरम्यान भिन्न भाषेविषयीच्या आपल्या समस्या सोडविण्यासाठी मुले आवर्जून आपल्या भिन्नभाषिक मित्र मैत्रीणींची मदत घेतात हे ही माझ्या लक्षात आले. माझे काम मुलांना शिकवणे एवढेच नव्हते तर मुलांना एकत्रित शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देणे हेही होते. हिंदी व मराठी भाषिक मुले आता एकमेकांच्यात इतकी मिसळून गेली होती की एकत्र बसणे दोन्ही भाषांचा वापर करीत वाचणे व शब्द अडल्यास एकमेकांना विचारणे हे अत्यंत नैसर्गिकरित्या घडत होते. एकदा ऋतिक एकटाच कपाटावर लावलेल्या चार्टचे वाचन करत होता.

ऋतिकः गाढव – गधा

कुत्रा – कुत्ता

झाड – .....

ऋतिकला पुढे काही वाचता येईना बहुतेक झाडाला काय म्हणतात ते आठवले नसावे. ऋतिकच्या जवळच जोहरिया मणी ओवत होती. ऋतिकने जोहरियाला हाक मारली.

'जोहरिया याला काय म्हणतात?'

जोहरिया : किसको?

ऋतिक : इसको, झाड को

जोहरिया : हां, पेड-पेड, झाड को पेड बोलते

ऋतिक : हं पेड... झाड-पेड

ऋतिकचे वाचन पुढे चालूच होते. मी जवळच होते पण ऋतिकला अडचण आल्यावर माझ्या आधी त्याला जोहरियाची आठवण आली व तिची मदत घेतल्यावर ती अडचण सोडविता येईल हे लक्षात आले.

माझ्या नोंदीमध्ये बरेचदा मुले वाचतात असा उल्लेख दिसेल. आम्ही आमच्या बालवाडीत अर्ली लिटरसी चा प्रयोग करीत असल्याने बालवाडीपासून मुलांच्या परिसरात लिखित अक्षरे असावीत व ती वारंवार वाचून दाखवली जावीत, मुलांनीही बाईंमागून म्हणावे असा प्रयत्न करीत असतो. बालवाडीमधील मुलांना आम्ही रूढ अर्थाने वाचन-लेखन शिकवीत नाही. तेव्हा मुले वाचत होती असे मी म्हणते तेव्हा मुले स्मरणातून बोलत होती, पण त्यावेळी त्यांची शब्दांखाली बोट ठेवून एका शब्दाला एक उच्चार ही कृती वाचनसदृश्य होती असा अर्थ अभिप्रेत आहे.

आमच्या बालवाडीतील मुले जमतील तशा मराठी व हिंदी या दोन्ही भाषा वापरत होती. बरेचदा दोन्ही भाषांची मिसळच वापरत होती. पण त्यात एक प्रकारची सहजता दिसे. मुले जेव्हा नैसर्गिकरित्या परिसरातून दुसरी भाषा शिकतात तेव्हा तिचा वापरही ती आपल्या मातृभाषेबरोबर सहज करू लागतात. अशा वेळी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. मुलांकडून कुठल्याही विशिष्ट भाषेचा किंवा अचूकतेचा आग्रह न धरता मुलांना अगदी मोकळेपणाने कोणत्याही भाषेत बोलू द्यायला हवे. एकदा मी पाठ घेऊन सळई पेटीचा उपयोग दाखविला. मग एकेकाला बोलावून समजावून देत होते. सौफीयाला सळई पेटी दिल्यावर त्यातील सळया तिने व्यवस्थित मोजून त्या त्या कप्प्यात टाकल्या. फक्त मोजताना तिने एक, दोन, तीन, चार, पाच, **छे**, सात, आठ, नऊ, **दस** असे काही अंक मराठीत तर काही हिंदीत म्हटले.

तोच प्रकार एरवीच्या गप्पांमध्ये देखील आढळला. गॅदरिंगसाठी बसवलेल्या नाटकात मी मुद्दामच काही हिंदी तर काही मराठी संवाद दिले होते. कार्यक्रमात भाग घेतलेल्यांना त्या त्या प्राण्याच्या नावाने ओळखले जात असे. एकदा सरावासाठी सगळे जमलेले असताना मुलांच्यातील गप्पा माझ्या कानावर पडल्या. धनराज : ए, बंदर कौन हाय रे? आदिती : सोनम, सोनम हाय बंदर. सोनमने लगेच माकडासारख्या उड्या मारून व हुप हुप करून दाखविले. सौफीया : घरी रखी है शेपूट. असे म्हणून दोघीपण हसायला लागल्या.

भाषा शिक्षणातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे त्या भाषेशी खेळायला लागणे, शाब्दिक कोट्या करणे, भाषा वैचित्र्य टिपणे, व्दयर्थी शब्द मुद्दाम वेगळ्या अर्थाने वापरणे इत्यादी. मुलांना जेव्हा वर्गात मोकळीक मिळते तेव्हा मुले हे उद्योग करतात. एकदा शब्द-चित्र चार्टचे वाचन घेत असताना मुळ्याचे चित्र दाखवले. त्याखाली लिहिलेले होते 'मुळा-मूली'. मी ते वाचून दाखविल्यावर आमचा सुजल लगेच म्हणाला 'ए मुली, बाई आपल्या वर्गात हायत की मुली' ऋतिकने लगेच मुली मोजल्या 'बाई, नऊच मुली हायत' यश म्हणाला, 'मुलं अकरा आलीत' यशने जागेवर बसूनच मुले मोजली होती आणि मुले अकराच होती. ऋतिक म्हणाला, 'मुलंच जास्त हायत मुलींपेक्षा' मी फक्त संवाद ऐकत होते. मी चार्टमधील मूळ्याचे चित्र दाखवून त्याला मराठी व हिंदीत काय म्हणतात हे सांगत असताना एका 'मूली' या शब्दावरून मुलांच्या बुध्दीची पाखरे कुठे-कुठे जाऊन आली, याची मलापण गंमत वाटली. मुलांना आपण शिकवत नाही, तर मुले सतत शिकत असतात त्याचे

आणखीन एक उदाहरण मला बघायला मिळाले.

मराठी व हिंदी अशा दोन भाषा वापरत असल्याने व्द्यर्थी शब्दांना तोटाच नव्हता. त्यामुळे वर्गात खूपशा शाब्दिक कोलांट्याउड्या कायमच चालत. एकदा दंगा करणाऱ्या मुलांना शांत करण्यासाठी मी समोर बसून काही न बोलता माझ्या डोक्यावर, कानावर, मानेवर, पोटावर हात ठेवण्याची कृती सुरू केली. हळू हळू मुलांनीही बोलणे बंद करून माझे अनुकरण करायला सुरूवात केली. मग मी अवयवांची नावे हिंदीतून सांगू लागले. सिर, आँखे, गर्दन, पेट, असे म्हणत पायावर हात ठेवला व म्हणाले पाव. पायावर हात ठेवून धनराजने पण कृती केली व म्हणाला, 'अरे पाव-पाव, वडा-पाव'. सोनम म्हणाली, 'नाय, चहाबरोबर खातो तो पाव'. सौफीयाने भर घातली, 'बेकरी से लाते न पाव'. पाव म्हणजे पाय, पण नुसता शब्द म्हणल्यावर मुलांनी त्या शब्दाचे काय काय वेगवेगळे अर्थ होतात व आपण काय करतो इथपर्यंत चर्चा केली. मला गंमत वाटून मी हसले तर धनराज माझ्याकडे बघून हसला आणि मुलांना स्वतःच म्हणाला, 'पाव म्हणजे पाय असतं रे' अशा गमतीदार प्रसंगात मराठीबरोबरच व हिंदी-भाषिक मुलेपण सहभागी होत होती.

कुरेशीनगरमधील मुलांना शाळेची गोडी लागावी, त्यांचा मराठी माध्यमातून शिकण्याचा मार्ग अधिक सुकर व्हावा असे मनात ठेवून मी हा प्रयोग सुरू केला होता. त्यामुळे त्या मुलांकडे माझे विशेष लक्ष असे. लायब्ररीमध्ये बोर्डवर आम्ही काही चित्रे व काही गाणी लिहून लावली होती. एक दिवस जोहरिया व सौफीया थोड्या उशिराच शाळेत आल्या. मुलांची शू ची सुट्टी झाली होती. कोणी नावाची कार्डे मोजत होते तर कोणी पुस्तक घेऊन वाचत होते. सौफीयाने सगळीकडे बघितले आणि मग लायब्ररीत गेली. बोर्डवरील कोपऱ्यात असलेल्या कार्डवरील गाणे तिला वाचायचे होते. काही न बोलताच तिने नुसते त्यावरून बोट फिरवले, बहुतेक गाणे कोणते आहे हे आठवले नसावे पण ते गाणे हिंदी होते हे तिला बहुतेक आठवत असावे. मग माझ्याकडे येऊन सौफीया म्हणाली, 'बाई, ए पढके दिखाओ न' मग मी पहिली ओळ वाचून दखविली 'कोयल काली चूना सफेद' नंतर मी वाचायच्या आधीच सर्व पुढच्या ओळी तिने स्वतः व्यवस्थित ओळीवर बोट ठेऊन म्हटल्या.

मराठी पुस्तकाबरोबर हिंदी पुस्तकांचे वाचन केल्यामुळे आफताब, जोहरिया व सौफीयाला वाचनाची चांगलीच आवड लागली आहे हे जाणवले. एक दिवस लायब्ररीमध्ये वाचनासाठी फक्त मराठी पुस्तकेच ठेवली गेली होती. गटातील काम झाल्यावर मुले इतरत्र ठेवलेल्या खेळाकडे किंवा लायब्ररीमध्ये पुस्तक वाचनासाठी जातात. जोहरिया माझ्या जवळ आली आणि म्हणाली 'मेरे को हिंदी पुस्तक होना' 'लायब्ररीत असेल ना' मी म्हटले. 'नही न मुझे पढना है।' जोहरियाने लावून धरले. मी लायब्ररीत बघितले तर खरेच हिंदी पुस्तक नव्हते, मग मी कपाटातली पुस्तके काढून दिली. जोहरियाने 'शोर ही शोर' हे पुस्तक घेतले. सोनमने पण लगेच 'मुझे दो, मुझे दो म्हणत 'मेरा नया डिब्बा' हे पुस्तक घेतले. जोहरिया 'शोर ही शोर' पुस्तक वाचत होती. प्रतीक्षा तिच्याजवळ येऊन पुस्तकात डोकावत होती. जोहरियाने दोघींच्या मधे पुस्तक धरले. मग प्रतीक्षाही लगेच तिथेच बसली. प्रतीक्षा

चित्र पाहून वाचत होती, 'बाळाची रडारड.' जोहरियाने जोडले, 'बच्चे की हैं' असे म्हणून दोघीजणींनी मिळून ते पुस्तक वाचले आणि दुसरीकडे सोनम 'मेरा नया डिब्बा' या हिंदी पुस्तकाचे वाचन मराठीत करीत होती. अधून मधून डबाच्याऐवजी डिब्बा, खाच्याऐवजी खाओ असे माहित असलेले हिंदी शब्द फक्त पेरीत होती. सगळ्यात शेवटी 'मेरा डिब्बा खतम हुआ' असे म्हणत तिने पुस्तक जागेवर ठेवले.

माझ्या या आणि अशा अनेक निरीक्षणांमधून माझ्या अभ्यासप्रकल्पाचा मुलांवर होणारा परिणाम मला जाणवत होता. मुलांमधील गट तर केव्हाच नाहीसे झाले होते. मुक्त खेळाच्या वेळी मुलांना कोणाबरोबर गट करायचा याची पूर्ण मोकळीक असताना सुध्दा आदिती आणि जोहरिया, धनराज - अफताब - यश असे गट पहायला मिळत.

वर्षभर सर्वच मुलांची उपस्थिती ८०% च्या वर होती. येवढ्या तेवढ्या कारणावरून गैरहजर राहणारी कुरेशीनगरमधील सौफिया शाळा बुडवायची नाही म्हणून तापातही शाळेत येण्याचा अट्टाहास करीत होती. हे पाहिल्यावर शाळेविषयी मुलांच्या मनात आपलेपणा निर्माण करण्याच्या माझ्या प्रयत्नांना फळ मिळाले असेच म्हणावे लागेल.

माझ्या एका उपक्रमात पालकांनी शाळेत येऊन मुलांबरोबर गप्पा मारणे, माहिती सांगणे, गोष्ट सांगणे याचा अंतर्भाव होता. आपली संस्कृती व भाषा शाळेत स्वीकारली जाते हे पालकांना समजल्यामुळे त्यांना शाळेबद्दल आत्मीयता वाटू लागली. पालक शाळेत आल्यावर माझ्याशी गप्पा मारीत. आपल्या बालपणीच्या, माहेरच्या आठवणी सांगत. एकमेकांच्या संस्कृतीबद्दल व भाषेबद्दल आपण आदर बाळगला पाहिजे याविषयी आमचे एकमत असे. पालक व शिक्षक असे आमचे नाते असूनही आमच्यात मैत्रीचा एक सुंदर धागा निर्माण झाला होता.

यावर्षी जोहरियाच्या अम्मींची शाळेत गाठ पडली तेव्हा त्यांना मुलींबद्दल विचारले तेंव्हा कळले जोहरिया आणि सौफिया दोघी उर्दू माध्यमाच्या शाळेत जातात. आफताब प्रबुध्द विद्याभवनच्या शाळेत जातो. जिया कराडला तिच्या आजोळी शिकण्यासाठी गेली आहे. पण चौघेही शाळेत जाताहेत. मराठी-भाषिक मुले शाळेच्या आजूबाजूलाच रहात असल्यामुळे अधूनमधून शाळेत येऊन जातात. जोहरिया, सौफिया आणि आफताबही कधीतरी एक-दोन आठवड्यांतून एकदा 'आपली शाळा' त चक्कर मारतात. आपलेपणाने इकडे-तिकडे फिरतात, बघतात. जणूकाही या शाळेत निर्माण झालेले प्रेमाचे, मैत्रीचे बंध त्यांना ओढून आणताहेत.

द्विभाषेतील सूचनांची यादी

मराठी	हिंदी
डबा इथे ठेवा.	डिब्बा इधर रखो।
बाटली काढून ठेवा.	बोतल निकाल के रखो।
ओळीत बसा.	कतार में बैठो।
हात जोडा.	हाथ जोडो।
ताठ बसा.	सीधा बैठो।
एकमेकांशी बोलू नका.	आपस में बातें मत करो।
तुझे नाव सांग.	तुम्हारा नाम बताओ।
तुमच्या गटाचे नाव काय?	तुम्हारे गट का नाम क्या है?
गोलात उभे रहा.	गोल में खडे रहो।
नंबर आल्यावर जावा.	नंबर आने पर जाओ।
गोष्ट ऐकायला या.	कहानी सुनने के लिए आओ।
खडूने चित्र काढा.	खडिया से चित्र निकालो।
चित्रावर बिया लावा.	चित्र पर बीज रखो (लगाओ)।
आकार बनवा.	आकार बनाओ (तैयार करो)।
गटात बसा.	गट में बैठो।
डेस्कखालून सरपटत जावा.	डेस्क के नीचे से रेंगते हुए जाओ।
पुसायला कापड वापरा.	पोछनें के लिये कपडा लो।
ट्युबमध्ये काडी घाला.	ट्युब के अंदर काडी डालो।
सगळे बॉल गोळा करा.	सब बॉल इकट्ठा करो।
दोरीवरून चला.	दोरी के ऊपर से चलो।
कोणाला ढकलू नका.	किसी को धक्का मत दो।
असे चित्र कुठे आहे.	ऐसा चित्र कहाँ है?
या चित्रात सारखे काय आहे?	इस चित्र मे कौनसी समानता है?
डबा सगळा संपवा.	पूरा डिब्बा खतम करो।
हात स्वच्छ धुवा.	हाथ अच्छी तरह से धो।
डोळे बंद करून बसा.	आँखे बंद करके बैठो।

काम पूर्ण करा.	काम पूरा करो।
त्याला थोडी मदत करा.	उसको थोडी मदद करो।
एकमेकांचे हात पकडा.	एक दूसरे का हाथ पकडो।
सामान कपाटात ठेवा.	सामान अलमारी में रखो।
वाट्या जमा करा.	कटोरी जमा करो।
रुमालाची घडी घाला.	रुमाल की घडी बनाओ।
सगळे स्वच्छ करा.	सब साफ करो।
बाहेर काही टाकू नका.	बाहर कुछ मत फेंको।
हात पकडून गोल फिरा.	हाथ पकड के गोल घूमो।
नाक पुसा.	नाक पोंछो।
एकावेळीच उडी मारा.	एक साथ कूदो।
चला परत जाऊ या.	चलो अब फिर से चले।
जोरात पळा.	तेज़ दौडो।
हळू पळा.	धीमे दौडो।
फुलपाखरू व्हा.	तितली बनो।
हळूहळू पंख हलवा.	धीरे-धीरे पंख हिलाओ।
कोण लहान आहे.	कौन छोटा है?
कोण मोठा आहे.	कौन बडा है?
वरती चढा.	उपर चढो।
हात वरती.	हाथ उपर।
हात खाली.	हाथ नीचे।
हात फिरवा.	हाथ घुमाओ।
खाली बसा.	नीचे बैठो।
उभे रहा.	खडे रहो।
खाली बघा.	नीचे देखो।
आत चला.	अंदर चलो।
बाहेर या.	बाहर आओ।
कागदावर नाव लिहा.	कागज पर नाम लिखो।
टेबलावर कागद ठेवा.	टेबल पर कागज रखो।
मांजरांनी पुढे उभे रहा.	बिल्लियाँ आगे खडी रहे।
आंब्याचे चित्र काढा.	आम का चित्र निकालो।

चांगले चित्र रंगवा.	चित्र को अच्छे से रंग दो ।
टाळ्या वाजवा.	ताली बजाओ ।
याच्या सारखे कोण आहे?	इसके जैसा कौन है?
एका नंतर दुसरे कार्ड लावत रहा.	एक के बाद दूसरा कार्ड लगाते जाओ ।
टिकल्या मोजून अकांचे कार्ड ठेवा.	बिंदियाँ गिनो और उस पर अंक के कार्ड रखो ।

द्विभाषिक गाण्यांचा संग्रह

हिंदी गाणी	मराठी गाणी
कोयल काली, चूना सफेद	कोकिळा काळी, चुना पांढरा
टायर काला, कागज सफेद	टायर काळा, कागद पांढरा
काजल काला, चावल सफेद	काजळ काळे, तांदूळ पांढरे
भैंस काली, दूध सफेद	म्हैस काळी, दूध पांढरे
कुछ हैं काला, कुछ हैं सफेद	काही काळे, काही पांढरे
बाहर देख, भीतर देख	बाहेर बघा, आत बघा
उपर देख, नीचे देख	वर बघा, खाली बघा
क्या हैं काला, क्या है सफेद	काय काळे, काय पांढरे
हाथी राजा बहुत भले	हत्तीराजा खूप चांगले
सूँड हिलाते कहाँ चले	सोंड हलवत कुठे निघाले
कान हिलाते कहाँ चले	कान हलवत कुठे निघाले
मेरे घर आ जाओ ना	माझ्या घरी या ना
हलवा पुरी खाओ ना	हलवा पुरी खा ना
बारिश आयी बारिश आयी	पाऊस आला पाऊस आला
छम-छम-छम-छम	छम-छम-छम-छम
लेकर छाता, निकले हम	आम्ही निघालो, छत्री घेऊन
पैर फिसला गिर गये हम	आम्ही पडलो पाय घसरून
उपर छाता नीचे हम	खाली आम्ही छत्री वरून

एक-एक, बनते अनेक
हाथ एक, उंगली अनेक
पेड एक, डाले अनेक
डाल एक, पत्तें अनेक
चिडिया एक, पंख अनेक
किताब एक, पन्ने अनेक
शाला एक, बच्चे अनेक
गाँव एक, घर अनेक
बादल एक, बूँद अनेक
जंगल एक, पेड अनेक

एक-एक मिळून होती अनेक
हात एक, बोटे अनेक
झाड एक, फांद्या अनेक
फांदी एक, पाने अनेक
चिमणी एक, पिसे अनेक
पुस्तक एक, पाने अनेक
शाळा एक, मुले अनेक
गाव एक, घर अनेक
ढग एक, थेंब अनेक
जंगल एक, झाड अनेक

एक छोटी उंगली टिम टीम.टीम टीम
उपर रखो नीचे रखो
फिर अपनी गोदी में रखो
दो, तीन, चार, पाच...

एका बोटाची टाळी वाजते का
नाही नाही नाही
दोन बोटांची टाळी वाजते का
नाही नाही नाही
तीन चार पाच दोन हाताची हो हो

राम नारायण बाजा बजाता
पि पि पि बांसरी बजाता
छुम-छुम-छुम घुंगरू बजाता
ढम-ढम-ढम-ढम ढोलक बजाता

राम नारायण पेटी वाजवतो
पि पि पि बासरी वाजवतो
छुम-छुम-छुम घुंगरू वाजवतो
ढम-ढम-ढम-ढम ढोलक वाजवतो

धम्मक धम्मक आता हाथी
धमूक धमूक जाता हाथी
अपनी सूँड हिलाता हाथी
अपने कान झुलाता हाथी
कितने केले खाता हाथी
ये तो नही बताता हाथी

धम्मक धम्मक येतो हत्ती
धम्मक धम्मक जातो हत्ती
आपली सोंड हलवतो हत्ती
आपले कान फिरवतो हत्ती
किती केळी खातो हत्ती
हे तर काही सांगत नाही

आज सोमवार है
दिया को बुखार है
दिया गयी डॉक्टर के पास
डॉक्टर ने दी सुई
दिया बोली वुई-वुई-वुई ।

मसाले भात मसाले भात
हम नही खाते हम नही खाते
क्यों नही खाते क्यों नही खाते
नमक नहीं न उस में ।

धोबी आया धोबी आया
कपडे साफ कपडे साफ
कितने कपडे लाया कितने कपडे लाया
१,२,३-४,५,६-७,८,९-१० बस ।

काला काला कौआ
एक दिन रूठा
ऊँचे पेडों के डाल पर बैठा
झुलते-झुलते थोडा मुस्कराया
खिलती कली को धीरेसे वो बोला
मैं हूँ कौआ जंगल का सिपाही
रंग मेरा सावला, मैं नही बावला
लाला ला ला लाला ला ...

चोंच में तिनका, पैरों में धागा
एक चिडिया खिडकी पर बैठी
दादी की कहानी उसने सुनी
उड जाने का भूल गई ।

आज सोमवार आहे
दियाला ताप आहे
दिया गेली डॉक्टरांकडे
डॉक्टरांनी दिली सुई
दिया म्हणाली वुई-वुई-वुई

मसाले भात मसाले भात
आम्ही नाही खात आम्ही नाही खात
का नाही खात का नाही खात
मीठ नाही त्यात मीठ नाही त्यात

धोबी आला धोबी आला
कपडे साफ कपडे साफ
किती कपडे आणले किती कपडे आणले
१,२,३-४,५,६-७,८,९-१० बस

काळा कळा कावळा
एकदा रुसला
उंच झाडाच्या फांदीवर बसला
झुलता झुलता खुदकन हसला
उमलत्या कळीला हळूच म्हणाला
मी आहे कावळा, जंगलचा मावळा
रंग माझा सावळा, मी नाही बावळा
लाला ला ला लाला ला ...

चोचीत काडी, पायात सुतळी
एक चिमणी खिडकीत बसली
आजीची गोष्ट तिने ऐकली
उडून जायची विसरून गेली

मैं हँसता हा-हा-हा	मी हसतो हा-हा-हा
मैं हँसती ही-ही-ही	मी हसते ही-ही-ही
हम हँसते दिनभर	आम्ही हसतो दिवसभर
मुझे लगा तो।	मला वाटले तर
ऊपर पंखा फिरता है	वरती पंखा फिरतो आहे
नीचे बेबी सोता है	खाली बाळ झोपले आहे
सोते-सोते भूख लगी	झोपता झोपता भूक लागली
मूंगफली खाना है	शेंगा मला खायच्या आहेत
मूंगफली में दाना नही	शेंगांमध्ये दाणे नाही
आप हमारे मामा नही	तुम्ही आमचे मामा नाही
मामा गए दिल्ली	मामा गेले दिल्लीला
वहाँ से लाए बिल्ली	तिकडून आणले मांजरीला
बिल्ली ने मारा पंजा	मांजरीने पंजा मारला
मामा हो गया गंजा।	मामा झाला टकला
अटक-मटक लोटा पटक	अटक-मटक तांब्या आपट
लोटे के नीचे पानी है	तांब्याखाली पाणी आहे
अब्बा मेरे राजा	बाबा माझे राजा
अम्मी मेरी रानी	आई माझी राणी

परिशिष्ट ३

भाषांतरीत केलेल्या गोष्टी (हिंदी व मराठी)

१. ससा व कासव

२. शेळीताई

३. माकड व मांजर

४. तहानलेला कावळा

हिंदी पुस्तक (हिंदीत वाचले व मरठीत अर्थ सांगितले) मोबाईल क्रशर

१. मिकी बंदर

२. हम सब एक

मिनाच्या गोष्टी (यूनिसेफ) चित्रावरून समजते का बघितले, मराठीत सांगावे लागले नाही.

१. आम का बँटवारा

२. बेटियों की देखरेख

३. क्या मीना को स्कूल छोडना पडेगा

४. मीना की तीन इच्छा

५. मुर्गियों की गिनती

CLR ची पुस्तके

मराठी– चला वाचूया	हिंदी– हम पढेंगे
१. माझा नवा डबा	१. मेरा नया डिब्बा
२. नवीन मुलगी	२. नयी लडकी
३. माझा फोटो	३. मेरी फोटो
४. लाडूबाई	४. लाडली बेटी
५. आवाजच आवाज	५. शोर ही शोर
६. शाळा आवडत नाही	६. मेरा साफ सूथरा स्कूल
७. जंगलात कोण कोण	७. जंगल में कौन कौन
८. साबणाचे फुगे	८. साबुन के बुलबुले
९. माझी बहीण आणि मी	९. मेरी बहन और मैं
१०. कागद घेऊन मजा	१०. कागज की मौज
११. खिडकी	११. खिडकी पर
१२. भातुकली	१२. भातूकली

परिशिष्ट ४

वर्गात रोज दिसणाऱ्या वस्तूंच्या कार्डांची यादी

दरवाजा –	दरवाजा	पाने –	पत्तें
पुस्तक –	किताब	साबण –	साबुन
खेळणी –	खिलौने	चमचा –	चम्मच
फुगा –	गुब्बारा	झोका –	झूला
आरसा –	आइना	चपाती –	रोटी
घड्याळ –	घडी	हळद –	हल्दी
पिशवी –	थैली	टोपली –	टोकरी
चावी –	चाभी	कागद –	कागज
डबा –	डिब्बा	कात्री –	कैंची
कपाट –	अलमारी	कंगवा –	कंघी
कुलूप –	ताला	खुर्ची –	कुर्सी
झाड –	पेड	दोरी –	रस्सी
ताट –	थाली	लाकूड –	लकडी
कोळसा –	कोयला	शर्ट –	कमीज
बाहुली –	गुडिया	वाटी –	कटोरी

चार्टमधील चित्रांच्या नावांची यादी

मासा	मछली	मोर	मोर
कासव	कछुआ	पोपट	तोता
ससा	खरगोश	माशी	मख्खी
कोंबडा	मुर्गा	चिमणी	चिडिया
माकड	बंदर	कोकिळा	कोयल
वांग	बैंगन	मोसंबी	मुसम्बी
बटाटा	आलू	सफरचंद	सेब
मुळा	मूली	आंबा	आम
द्राक्षे	अंगूर	जांभूळ	जामून
केळ	केला	पपई	पपीता
मिरची	मिर्च	हिरवा	हरा
तांदूळ	चावल	काळा	काला
हात	हाथ	लाल	लाल
डोळे	आँखे	पिवळा	पीला
मान	गर्दन	हळद	हलदी
पाय	पैर	जांभळा	जामूनी
केस	बाल	हत्ती	हाथी
हरिण	हिरन	उंदीर	चूहाँ
कोळी	मकडी	पक्षी	पंछी
कावळा	कौआ	बदक	बतख